## <u>ठाणे महानगरपालिका, ठाणे</u>

महापालिका सचिव कार्यालय,
दिांक :- १६/०७/२०१४

**मा. विशेष सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक ०६ दिनांक १६/०७/२०१४**
**सभा सूचना क्रमांक ०३ दनांक ०५/०७/२०१४**
**सभा क्रमांक ०२ दिनांक १६/०७/२०१४**

ठाणे महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १५/०७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०३ दिनांक ०५/०७/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती. परंतू सदर दिवशी सभा खंडीत केल्याने सदरची सभा बुधवार दिनांक १६/०७/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील हे उपस्थित होते.

सदर सभेस उपस्थित सदस्य खालीलप्रमाणे .

**१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पाटील- महापौर**
**२) श्री. मुकेश मधुकर मोकशी-उपमहापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | आरज प्रगती भारत | 4 | नरेश रतन मणेरा |
| 5 | मढवी बिंदू महेंद्र | 6 | डुंबरे मनोहर जयसिंग |
| 7 | मिलिंद माधव पाटणकर | 8 | उज्वला रामचंद्र फडतरे |
| 9 | मिनाक्षी राजेंद्र शिंदे | 10 | मधुकर रामचंद्र पावशे |
| 11 | स्नेहा अंकुश पाटील | 12 | भोईर संजय देवराम |
| 13 | उषा संजय भोईर | 14 | चव्हाण तेजस्विनी किरण |
| 15 | आशादेवी शेरबहादूर सिंह | 16 | वाव्हळ सुभाष सिताराम |
| 17 | इंदिसे रेखाबाई मिनानाथ | 18 | संभाजी धोंडिराम पंडीत |
| 19 | प्राजक्ता प्रदिप खाडे | 20 | विलास चंदू कांबळे |
| 21 | सुशिला संकटाप्रसाद यादव | 22 | राधा फत्तेबहादूर सिंह |
| 23 | राजकुमार रामनयन यादव | 24 | चिंदरकर कांचन विजय |
| 25 | सरैय्या अमित जयसिंग | 26 | जाधवर राधाबाई सुभाष |
| 27 | जगदाळे हनुमंत ज्ञानु | 28 | पाटील वर्षा वसंत |
| 29 | पालांडे दशरथ बाबुराव | 30 | सरनाईक परिषा प्रताप |
| 31 | सरनाईक विहंग प्रताप | 32 | भोईर विमल अर्जून |
| 33 | पांडे संजय श्रीनाथ | 34 | पाटील कल्पना हरिश्चंद्र |

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | पाटील शारदा विजय | 36 | साप्ते राजेंद्र रमेश |
| 37 | लासे विजया मनोज | 38 | गौरी अनिता सुनील |
| 39 | पाटील उमेश काशिनाथ | 40 | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| 41 | देसाई सुहास सुर्यकांत | 42 | महेश्वरी संजय तरे |
| 43 | एगडे रामचंद्र हरी | 44 | नंदा कृष्णा पाटील |
| 45 | नंदिनी राजन विचारे | 46 | मंदार प्रमोद विचारे |
| 47 | वडवले संतोष वसंत | 48 | कणसे निर्मला शरद |
| 49 | वैती अशोक बारकू | 50 | बोरीटकर प्रभा अशोक |
| 51 | आशा बाबासाहेब कांबळे | 52 | भोईर एकता एकनाथ |
| 53 | संगिता माणिक पाटील | 54 | जितेंद्र प्रभाकर वाघ |
| 55 | घाडीगांवकर संजय पांडुरंग | 56 | मोरे संध्या सुनिल |
| 57 | खताळ विशाखा मधुकर | 58 | जानकर योगेश तातोबा |
| 59 | फाटक जयश्री रविंद्र | 60 | फाटक रविंद्र सदानंद |
| 61 | जगताप अश्विनी अशोक | 62 | संखे मिनल मुकूंद |
| 63 | वेतकर दिपक विजय | 64 | म्हस्के नरेश गणपत |
| 65 | भोसले नम्रता दिपक | 66 | पाटील सुजाता भास्कर |
| 67 | हिराकांत बेंडू फर्डे | 68 | नारायण शंकर पवार |
| 69 | मोरे रुचिता राजेश | 70 | कोकाटे सुधीर विष्णु |
| 71 | सोनार सारिका संजय | 72 | वाघ पुजा गणेश |
| 73 | महेश सुरेश वाघ | 74 | साळवी मनोहर रामा |
| 75 | साळवी अपर्णा मिलींद | 76 | मनिषा महेश साळवी |
| 77 | महेश जगन्नाथ साळवी | 78 | पाटील मिलींद भारत |
| 79 | पाटील मनाली मिलींद | 80 | केणी मुकूंद बाळू |
| 81 | केणी प्रमिला मुकूंद | 82 | सामंत विलास शिवराम |
| 83 | मेघना सुनिल हंडोरे | 84 | संजय संतू वाघुले |
| 85 | अनिता अरुण बिर्जे | 86 | भारत अभिमन्यु चव्हाण |
| 87 | पाटील मालती रमाकांत | 88 | राजे गिरीश अनंत |
| 89 | रेखा भालचंद्र पाटील | 90 | काकडे बालाजी दगडू |
| 91 | नाईक राजश्री सुनिल | 92 | कुरेशी यासीन अय्युब |
| 93 | ठाकुर अक्षय अनंत | 94 | विश्वनाथ भगत |
| 95 | किणे राजन नारायण | 96 | भगत सुधीर रामचंद्र |
| 97 | मिरजा जमेला तबस्सूम इनायत बेग | 98 | पाटील रेश्मा रमेश |

| | | | |
|---|---|---|---|
| 99 | आशरीन इब्राहीम राऊत | 100 | पठाण अशरफ उस्तान |
| 101 | शेख रजिया इकबाल | 102 | अफिजा नसीरुद्दीन नाईक |
| 103 | पाटील शैलेश मनोहर | 104 | खान मिराज नईम |
| 105 | डोंगरे सिराज महम्मद अली | | |

गैरहजर सदस्य खालीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | पुर्णेकर जयनाथ यशवंत | 2. | चव्हाण सुधाकर वामन |
| 3. | चव्हाण विक्रांत भिमसेन | 4. | डिसोजा लॅारेन्स साल्वाडोर |
| 5. | मिलिंद माधव पाटणकर | 6. | तायडे रामभाऊ महादेव |
| 7. | शान मनप्रीत गुरमकसिंग | 8. | शिंदे मनोज तुकाराम |
| 9. | काशिराम गोविंद राऊत | 10. | मोरे संजय भाऊराव |
| 11. | नजीब सुलेमान मुल्ला | 12. | वहिदा मुस्तफा खान |
| 13. | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट | 14. | लोखंडे सुहासिनी सुनिल |
| 15. | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) | 16. | राजेश भालचंद्र गवारी |
| 17. | पाटील अवंतिका शशिकांत | 18. | यादव रिटा राजनाथ |
| 19. | कळंबे मंगल चंद्रकांत | 20. | कुरेशी साजिया आई |
| 21. | आसिया यासिन कुरेशी | 22. | गोटे सिंधू कुंदन |
| 23. | खान रऊफ अफजल | 24. | अन्सारी साजिया परवीन सरफराज |
| 25. | हिरा सिताराम पाटील | 26. | मुंडे सुनिता गणेश |

रजा सदस्य खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| 1. | भारत अभिमन्यु चव्हाण |

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास मा.महापौर सो. पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतात.

मा.महापौर :

सन्मा.सदस्यांना विनंती केली जात आहे की अर्थसंकल्पावरील जमा-खर्चावर आपले मनोगत व्यक्त करावे.

श्री.दशरथ पालांडे :

मा.महापौर, मा.स्थायी समिती सभापती श्री.सुधाकर चव्हाण यांनी महापालिकेचा सन २०१३-१४ चा सुधारित व सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प आपणास सादर केला व आपण तो सभागृहासमोर ठेऊन सन्मा.सदस्यांना अर्थसंकल्पावर बोलण्याची संधी दिलीत त्याबद्दल धन्यवाद. माझी तब्येत ठिक नसल्याने मी माझे लेखी विचार याठिकाणी देत आहे. या सभागृहामध्ये सर्वकाही आलबेल चालु आहे, आम्ही आपल्या पाठीशी आहोत, सभागृह चालवत असताना आपल्यासमोर ब-याच अडचणी आल्या असतील परंतू आम्ही खंबीरपणे आपल्या पाठीशी उभे आहोत. आपण सन्मा.विक्रांत चव्हाण,संजय घाडीगांवकर,मनोहर डुंबरे यांना सांभाळले तर हे सभागृह व्यवस्थित आलबेल चालेल, पुन्हा एकदा मी सांगतो की आम्ही आपल्या पाठीशी आहोत,आणि आपल्या पाठीशी राहणार जयहिंद जयमहाराष्ट्र.

महोदय, जमेची बाजु बोलत असताना महापालिकेचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत म्हणजे पुर्वीचे जकात आता एलबीटी. एलबीटीची वसुली कशी करावी व ती कशाप्रकारे होणार आहे याची जागरुकताच मुळात व्यापारीवर्गामध्ये व उदयोगामध्ये झालेली नाही. एलबीटी फक्त मुख्य शहरामध्ये मर्यादीत न ठेवता शहराच्या इतर भागामध्ये, चौकाचौकामध्ये बॅनर लावुन एलबीटी वसुलीबाबत महापालिकेचे काय धोरण आहे हे व्यापारीवर्गाला पटवुन दिले तर एलबीटी नक्कीच चांगल्याप्रकारे वसुल होऊ शकेल. एलबीटी बाबत शासनाच्या धोरणांचा प्रश्न नाही. शासनाच्या निर्णयाची वाट न पाहता आतापासुन आपले उद्देश साध्य करण्यासाठी कठोर निर्णय घेऊन प्रशासनाने वसुलीच्या कामाला लागावे असे मी सुचवित आहे. दुसरे उत्पन्नाचे साधन म्हणजे मालमत्ता कर. याबाबतीत मी मागिल ५-६ वर्षे अर्थसंकल्पावर बोलताना सुचित केले होते की,मालमत्ता कराबद्दल एक मोठी मोहिम आखुन संपूर्ण ठाणे शहराचे मालमत्ता कराबाबत सर्व्हेक्षण करावे व त्यावर तांतडीने कर आकारणी केली तर दुपटीने मालमत्ता कर वाढेल याची मला खात्री आहे परंतू असे होत नाही हिच मुळात दुःखाची बाब आहे. यावर प्रशासनाने गांभिर्याने विचार करावा. इतर जमेच्या बाजुमध्ये प्रशासनातील अधिका-यांनी महापालिकेचे धोरण व्यवस्थित राबवले तर नक्कीच प्रत्येक विभागामध्ये उत्पन्नामध्ये वाढ होऊ शकते. विशेषकरुन जाहिरात विभागामध्ये दुपटीने वाढ होण्याची शक्यता आहे. परंतू त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप नसावा ही मी सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करत आहे.

खर्चाच्या बाजुचा विचार केल्यास महापालिकेच्या उत्पन्नातुन अनुदानातुन व घेतलेल्या कर्जातुन प्रभागातील विकास कामे व मोठमोठी कामे केली जातात परंतू मागे झालेल्या कामाच्या अनुभवातुन असे दिसुन येते की, विकासाची कामे करताना समतोल राखला जात नाही. प्रशासन कुणाच्यातरी दबावाने कामे करीत आहे असे दिसुन येते. कांही ठराविक ठिकाणी कामे जातात. यामध्ये महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व प्रशासन प्रमुखच जबाबदार आहेत असे मी म्हणेन.

संपूर्ण ठाणे शहरातील चौक,उदयान याचा विचार केल्यास चौक,उदयाने आपण बांधली तयार केली परंतू त्यांची निगा व देखभालीचे कांय? चौकाची काय दुर्दशा झाली आहे याबाबत माझ्या मते संपूर्ण ठाणे शहराला आपण व आयुक्त यांनी संयुक्त दौरा करावा मग खरी वस्तुस्थिती आपल्या लक्षांत येईल. उदयानाबाबत दैनिक लोकमत या वृत्तपत्राने उदयानाच्या दुर्देशेबद्दल एक मालिका वृत्तपत्रातुन सादर केली. यामध्ये माझ्या प्रभागातील दोन मोठया उदयानाचा समावेश होता. याबाबतीत माझ्याकडुन मी माझ्या पध्दतीने खुलासा केला परंतू आयुक्त साहेबांना पत्र पाठवुन देखिल त्याची साधी पोच सुध्दा मला मिळाली नाही व प्रशासनाकडुन कुठलीही हालचाल झाली नाही हे दुर्देव आहे. तरी वेळ गेली नाही. शहरातील चौकाचे तसेच उदयानांची तांतडीने पाहणी करुन तांतडीने निर्णय घ्यावा व त्याप्रमाणे या बजेटमध्ये आर्थिक तरतुद करावी त्यामुळे आपले हरित ठाणे सुंदर ठाणे हे घोषवाक्य प्रत्यक्षात साकार होईल.

बांधकाम विभागाची सुध्दा तीच परिस्थिती आहे. आपण रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करतो परंतू दोन्ही बाजुच्या दुर्दशा झालेल्या तुटलेल्या फुटपाथबद्दल काहीच करत नाही तरी कॉंक्रिटच्या रस्त्याबरोबर त्यामध्ये दोन्ही बाजुच्या फुटपाथची कामे समाविष्ट करावी त्यामुळे रस्त्याचा एक वेगळा चेहरा जनतेसमोर दिसुन येईल.

महोदय, बांधकाम खात्याने इमारत दुरुस्तीबाबत अर्थसंकल्पामध्ये कुठेच तरतुद केलेली नाही. इमारत बांधणे या शिर्षकाखाली असलेली तरतुद ही मायनसमध्ये दाखविली गेली आहे. मागिल कित्येक वर्षापासुन आमदार, नगरसेवक व खासदार यांच्या विकास निधीमधुन गरीब जनतेला मुलभूत सुविधा, मुलांना व्यायामशाळा व सांस्कृतिक मंच म्हणुन काही वास्तु बांधण्यात आल्या आहेत. कांही वास्तु २०-२५ वर्षे जुन्या आहेत. कांही सामाजिक संस्थांमार्फत नाममात्र भाडे महापालिकेला भरुन झोपडपट्टीतील गरीब जनतेसाठी विविध उपक्रम राबवले जातात.परंतू आता त्या वास्तु जिर्ण व मोडकळीस आल्या आहेत. परंतू त्या वास्तुंची दुरुस्ती व्हावी म्हणून बांधकाम विभागाने व स्थावर मालमत्ता विभागाने त्याची दखल घेतली नाही. तरी प्रशासनाने स्थावर मालमत्ता व बांधकाम विभागाने याची तांतडीने दखल घेऊन व त्याप्रमाणे बजेटमध्ये तरतुद करुन जिर्ण झालेल्या वास्तुंची दुरुस्ती करावी व त्याठिकाणी गरीब झोपडपट्टीतील नागरीकांना चांगली सेवा उपलब्ध करुन दयावी असे मी सुचवित आहे.

घनकचरा विभागाबद्दल न बोललेले बरे! खर्च जास्त व त्यातुन होणारी कामे ही नागरीकांना सुविधा देणारी नसुन नागरीकांच्या करातुन जमा होणा-या पैशाची नुसती उधळपट्टी आहे. हे मी आपणास अनेक उदाहरणे देऊन सिध्द करुन दाखवु शकतो. एकच उदाहारण म्हणजे रोडची सफाई याबाबतीत मी मागे घनकचरा विभागाकडे पत्रव्यवहार देखिल केलेला आहे. परंतू आमच्या पत्राची दखल घेतली जात नसल्याने आता नको तो पत्रव्यवहार असे वाटत आहे.

शेवटी महानगरपालिकेने ९ प्रभाग समितीच्या १० प्रभाग समिती केल्या, त्यामध्ये लोकमान्यनगर ही नविन प्रभाग समिती झाली. या समितीमध्ये माझ्या प्रभागाचा समावेश आहे. परंतू या समितीची जागा कुठे आहे, अधिकारी कोण याबाबत मला काहीच माहिती नाही. तरी या समितीबाबत पुढील कामासंदर्भात तांतडीने निर्णय होऊन याकामी होणा-या खर्चाची अर्थसंकल्पात तरतुद करुन तांतडीने निर्णय घ्यावा. धन्यवाद.

श्रीमती मनाली पाटील :

महापौर महोदय,सन्मा.आयुक्त महोदय,मा.सभापती स्थायी समिती,सर्व सन्मा.नगरसेवक, नगरसेविका. सन २०१४-१५ चा २३८५ कोटीचा मुळ अर्थसंकल्प स्थायी समिती सभापती यांनी सादर केला असुन हा अर्थसंकल्प सादर करताना केलेली अर्थसंकल्पाची तरतुद आणि मागिल

स्पिलओव्हर पाहता महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजुक आहे असे दिसते. विविध करांव्दारे मिळणारे उत्पन्न अपेक्षित जे होते ते न मिळाल्यामुळे ही परिस्थिती आली आहे असे दिसते. पाणी बिल आणि प्रॉपर्टी टॅक्सव्दारे मिळणारे उत्पन्न वाढविण्यासाठी हया बिलांचे डि-सेंट्रलायझेशन करायला पाहिजे, बिल प्रत्येक प्रभाग समितीमध्ये तयार करुन तेथेच ती वाटली गेली पाहिजे कारण आत्ताच्या पध्दतीनुसार ही बिले प्रत्येक प्रभाग समितीमध्ये मिळेपर्यंत सहा सहा महिने लागतात आणि बिले भरण्यास विलंब होतो ही बिले जर वेळेत मिळाली तर नागरीक ही बिले वेळेवर भरु शकतील आणि नागरीकांची तशी मानसिकतासुध्दा असते. तरी आपण हया विभागाचे उत्पन्न त्या त्या प्रभाग समितीमध्ये टॅक्सची बिले तयार करुन आपण वाढवु शकतो. कळवा प्रभाग समितीची वाढणारी लोकसंख्या पाहता,पाणीपुरवठा व पाणीविस्तार जलवाहिन्या टाकणे या हेडअंतर्गत जी तरतुद करण्यात आली आहे ती नौपाडा प्रभाग समितीएवढीच आहे. वास्तविक पाहता नौपाडा प्रभाग समितीची लोकसंख्या स्थिर आहे आणि कळव्याची लोकसंख्या वाढती आहे आज येथे गृहसंकुले वाढत आहेत कळवाकरीता जास्त तरतुद ज्याप्रमाणे रायलादेवी आणि वागळे इस्टेट प्रभाग समितीकरीता केली आहे त्याप्रमाणे करण्यात यावी. पाणी चोरी आणि पाणी गळतीचे प्रमाण थांबविण्याकरीता अभय योजना राबविणे आवश्यक आहे. ज्या ज्याठिकाणी अनधिकृत इमारती आहेत झोपडपट्टया आहेत त्याठिकाणी आपण पाणी पुरवठा करतो परंतू आपण त्यांचेकडुन पाणी बिल वसुल करत नाही. तरी याकरीता आपण अभय योजना राबविली पाहिजे. आणि पाणी गळतीचे प्रमाण रोखण्याकरीता पाण्याचे जे वितरण आहे ते समसमान करुन तसेच पाईपसिस्टीम व्यवस्थित करुन ते प्रमाण कमी केले पाहिजे.

शहरविकास विभागाने निवारा निधीची जी तरतुद केली आहे तरी निवारा निधीचा विनीयोग शहरी गरीबांसाठी त्यांचा उपयोग करण्यात येणार आहे. परंतू गरीबीची नक्की व्याख्या कोणती ,येथे नक्की कोणता क्रायटेरिया गरीबीचा वापरला आहे ,कारण गरीबीची व्याख्या दरवेळी बदलली जाते आणि हा निधि नक्की कोणासाठी वापरला जाईल याची व्यवस्थित तरतुद येथे करण्यांत यावी.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय - सदर रुग्णालयाकरीता आपण कोटयावधी रुपये हे मशिनरी,औषधे व इतर सुविधांकरीता पुरवत असतो. परंतू प्रत्यक्षातमात्र या सुविधांचा तेथे अभावच दिसतो. शहरी ग्रामिण भागातुन या रुग्णालयात बरेच रुग्ण येत असतात. परंतू त्यांना तेथे औषधे,डॉक्टर या सगळयाचा तुटवडा भासतो. मग अशापरिस्थितीत एवढा आपण निधी पुरवुन हे रुग्णालय आपण चालवतो तर ते व्यवस्थित चालवले जात नाही तेथील रुग्णालय चालविण्यास आपण असमर्थ आहोत असेच दिसत आहे. तरी हे रुग्णालय आपण राज्य शासनाला वर्ग करुन हा निधी प्रभाग समितीतील प्राथमिक आरोग्य केंद्र सक्षम करण्याकरीता वापरता येईल. ज्या प्रभाग समितीमध्ये असे आरोग्य केंद्र नाही तेथेसुध्दा आपल्याला प्राथमिक केंद्र उभे करता येईल.

घनकचरा व्यवस्थापन : याकरीता रि-युज,रिडयुस आणि रिसायकल ही त्रिसुसुत्रता अंमलात आणणे आवश्यक आहे. आणि घनकचरा व्यवस्थापन आपण करताना पर्यावरणपुरक असे जे प्रकल्प आहेत ज्याप्रमाणे कॉंपोज, व बायोगॅस प्रकल्प आहेत असे प्रकल्प आपण राबवायला पाहिजेत. ज्या प्रभागसमितीमध्ये जेथे जागा आहे त्याठिकाणी आपण हे प्रकल्प आपल्याला सोईनुसार राबविता येतील. ज्याप्रमाणे कळव्याचा डोंगराळ भाग आहे या प्रकल्पासाठी या प्रभाग समितीमध्ये जागासुध्दा उपलब्ध आहे तेथे कच-याचा मोठया प्रमाणात ढिग असतो तरी ही कच-याची समस्या आणि तिची योग्यप्रकारे विल्हेवाट या प्रकल्पान्वये आपल्याला लावता येईल.

उदयान विभाग - या विभागांत आपण फक्त वृक्ष लागवड न करता आपण चांगल्या पध्दतीची झाडे जी ऑक्सीजन जास्त पुरवतात ज्याप्रमाणे वड, पिंपड अशी झाडे किंवा आयुर्वेदीक झाडे आवळा,हिरडा,अशाप्रकारची झाडे लागवडीसाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. आणि वृक्ष लागवड ही नुसती लागवड न करता त्याची निगा व संगोपन राखण्याचे काम हे व्यवस्थित केले पाहिजे.

शहराची वाढती वाहतुककोंडी पाहता, आज एलआरटी,मोनो,मेट्रो अशाप्रकारची विविध स्वप्ने जी आपण ठाणेकर नागरीकांना दाखवित आहोत ती स्वप्ने न दाखविता आपल्याकडे उपलब्ध असलेली जागा आणि उपलब्ध असणारा निधी या दोघांचाही विचार करुन ठाणेकर नागरीकांकरीता सर्वसमावेशक असा एखादा ठोस प्रकल्प आपण ठाणेकर नागरीकांसाठी आणला पाहिजे. जेणेकरुन जे सहनशिल ठाणेकर नागरीक आहेत त्यांच्या सहनशिलतेचा अंत न पाहता त्यांच्यासाठी योग्य अशी उपाययोजना करु शकतो. आणि आपले जे पार्कीगचे धोरण होते ते धोरण आपण गेल्यावर्षी मंजूर केले आहे परंतू त्याची अंमलबजावणी अदयाप झालेली नाही तरी ती वेळेत व्हावी.

एकंदरीत हा अर्थसंकल्प पाहता ठाणेकरांना अच्छे दिन येण्याकरीता बरीच वाट पहावी लागणार आहे असेच दिसते. मी पुन्हा एकदा मा.महापौर,उपमहापौर,माआयुक्त तसेच केंद्र शासन आणि राज्य शासन यांचे आभार मानते कारण केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या निधी,अनुदान आणि कर्जातुन आणि मिळणा-या उत्पन्नातुन आपण आपल्या शहराचा विकास करत असतो त्यामुळे मी या दोघांचेही आभार मानुन माझे भाषण संपवित आहे जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्रीमती परिषा सरनाईक :

महापौर महोदय, मा.सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, मा.सभापती स्थायी समिती मा ायुक्त साहेब तसेच सभागृहातील सर्व नगरसेवक, नगरसेविका, ठाणे महापालिकेचा अर्थसंकल्प जमाखर्चाबाबत सदस्यांनी आपापल्या पध्दतीने ब-याच सूचना केल्या आहेत. अर्थसंकल्पातील जमा आणि खर्चाबाबत मी कांय बोलु हे मला कांही सुचत नाही परंतू माझ्या कांही सूचना आहेत त्या थोडयाशा आपण अंमलात आणल्या तर चांगले होईल. महापालिका क्षेत्रामध्ये उभारण्यात येणा-या इमारतीत आपण जे ग्रीन बिल्डींग आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग हे सध्या तरी सोसायटीत कंपलसरी करण्यांत आलेले नाही. आणि ज्या सोसायटयांनी हे तिन्ही प्रकल्प राबविले आहेत रेन वॉटर हार्वेस्टिंग,झिरो गार्बेज किंवा ड्रेनेज हे राबविले असेल तर त्यांना पाच टक्के करामध्ये सुट देण्यात यावी ती देण्यांत येत नाही. हा प्रकल्प जर सगळीकडे राबविला तर सौर उर्जा आणि पाण्याचा जो प्रॉब्लेम आहे तो नक्कीच यामुळे कमी होणार आहे.

महिला बालकल्याण विकासाकरीता २० कोटीचे बजेट आहे. तरी हा निधी या दोन ते तीन वर्षात महिलांकरीता हा निधी बिलकुल वापरण्यात आला नाही हे मी ठोसपणे सांगत आहे. यावेळी मा.आयुक्तांनी एक नविन योजना महिला सबलीकरण योजना आणली आहे परंतू ती योजना कांय आहे व ती कधी अंमलात आणणार आहे याबाबत पुर्णपणे माहिती देण्यांत आलेली नाही. त्याचप्रमाणे वतर्कनगरमध्ये महिला बचत गट भवन केले आहे मला मा.आयुक्तांचे मनापासुन धन्यवाद मानायचे आहेत कारण आपण महिलांना दोन रुपये पाच हजार रुपये वाटत होते ते बंद करुन महिलांना सबलीकरण करण्याचा विचार केला आहे. परंतू त्यामध्ये त्यांना कोणत्याही

एका उदयोगाचे ट्रेनिंग देण्यात यावे.कारण आज ज्या कांही गोरगरीब महिला आहेत त्यांना कोणत्याही प्रकारचे नॉलेज नसते तरी याबाबत एक ट्रेनिंग सेंटर चालु केले तर त्या महिला स्वावलंबी होतील. ज्याप्रमाणे् लिज्जत पापड गृह उदयोग आहे त्याचप्रमाणे आपणसुध्दा टीएमसी ब्रँड आपण तयार अशाप्रकारचे छोटे छोटे उदयोग आपण करुन तो आपण ठाणे शहरात तसेच महाराष्ट्रात विकले गेले तर ख-याअर्थाने सबलीकरण अस्तित्वात येईल. त्याचप्रमाणे जो निधी बाकी राहतो तर त्याबाबतीत माझी एक सूचना आहे की महिलांच्या आरोग्यासाठी कधीच काही केले जात नाही. आज कॅंसर अव्हेरनेस जे आहे ते कोठेच राबविले जात नाही. आपल्या ठाणे महापालिका हद्दीतील महिलांना एक हेल्थ कार्ड जर दिले ते योग्य होईल.

यावर्षी प्रशासनाने अपंग तसेच मतीमंद मुलांसाठी धोरण राबविले आहे त्यांना दरमहा पंधराशे रुपये दिले जाणार आहेत ही चांगली गोष्ट आहे परंतू मला याबाबत वाटते की असे करुन आपण त्यांना कोठेतरी डिपेंडंटच ठेवत आहोत त्यांना स्वालंबी करत नाही आहोत असे माझे मत आहे. नक्कीच अशा मुलांच्या पालकांना त्यांच्या औषधाकरीता तसेच शिक्षणाकरीता उपयोग होणार आहे. ठाणे् महापालिकेने या मुलांसाठी प्रापर जर थेरेपी सेंटर उभे करावे व त्यांना औषधी ही आपल्याकडुन देण्यात यावीत. तसेच या मुलांच्या पालकांचा मनाचा विचार करुन त्यांच्यासाठी एक कौन्सिलिंग सेंटर केल्यास एक आगळेवेगळे धोरण अंमलात येईल. तरी माझी विनंती आहे की आपण बाकीच्या ज्या योजना राबवित आहोत तसेच एक थेरेपी सेंटर उभे करावे कारण यामधुन सिध्द झाले आहे की या मुलांच्या एका ठराविक वयात त्यांना ही थेरेपी देण्यात येते त्यामुळे त्यांच्यात थोडयाप्रमाणात का होईना सुधारणा दिसुन येते. तसेच अठरा वर्षानंतरची जी मुले आहेत त्यांच्यासाठीच कांहीच धोरण राबविले गेले नाही. कारण अठरा वर्षानंतरच्या मुलांना सांभाळणे हे त्यांच्या पालकांना फारच कठीण होऊन जाते. तरी अशा मुलांकरीता कटींग,चॉपिंग,मेणबत्ती बनविणे ,पॅकींग करणे अशाप्रकारचे प्रॉपर ट्रेनिंग सेंटर महापालिकेने राबविले तर अशाप्रकारची मुले ही स्वावलंबी होतील. तसेच त्यांच्यासाठी होमएजसुध्दा बनविले पाहिजे.

जेष्ठ नागरीकांकरीता एक योजना राबविली गेली होती त्यामध्ये महापालिका आणि ओरिएंटल इंश्युरंन्स कंपनी हे अर्धेअर्धे पैसे भरत होते. तसेच ही जी रक्कम ३० हजार होती ती ५० हजार करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.परंतू आता ही योजना पुढे अंमलात आणली गेली नाही. तसेच मी पुर्ण ठाणे शहराच्यावतीने मागणी करीत आहे की परिवहनमध्ये त्यांना ५० टक्के सवलत दिली जावी.

क्रीडा धोरणबाबतएक चांगली उपाययोजना आहे याकरीता महापालिकेने अर्थसंकल्पात घसघशीत तरतुद केली आहे व याबाबत मी महापालिकेची आभारी आहे. परंतू महापालिका क्षेत्रातील खेळाडुंना प्रोत्साहन देणे ज्यापध्दतीने ठाणे गौरव व ठाणे क्रीडा असा पुरस्कार दिला जाणार आहे परंतू मला वाटते जी मुले स्टेटलेव्हला सिलेक्ट होतात तर त्यांना नॅशनलकरीता महापालिकेने पुढाकार घ्यावा. कारण अशी जी मुले सिलेक्ट होतात त्यांना जेव्हा फी भरायची असते किंवा ट्रेनिंगकरीता त्यांना हात पसरावे लागतात, तरी महापालिकेकडुन त्यांना याबाबत कांहीतरी मोबदला दिला जावा,कारण जिंकुन आल्यानंतर प्रोत्साहन देण्यापेक्षा अगोदरच त्यांना पाठींबा दिल्यास योग्य होईल.

पार्कीग धोरणाबाबत तत्कालीन आयुक्तांनी सायकल स्वारीसुध्दा केली होती, परंतू पार्कीगबाबतचे धोरण प्रत्यक्षात अंमलात आणले गेले नाही. आज निवासी एरियामध्ये कोठेही पार्कीग केले जातात,ट्रकसारख्या गाडयासुध्दा निवासी एरियामध्ये पार्क केल्या जातात. ट्रक चालविणारे जे ड्रायव्हर असतात त्यांची वागणुक कशी असते. रेसिडेंशनलमध्ये हा होणारा त्रास

आहे. मी वर्तकनगरप्रभाग समितीमध्ये मध्यंतरीसुध्दा सूचना दिल्या होत्या की तुम्ही त्यांना पोडीयम पार्कींग म्हणजे गार्डन आणि पार्कींग हे धोरण राबवावे. व यामध्ये पार्कींगमधुन आपल्याला चार्ज मिळुन आर्थिक बाजुसुध्दा आपली चांगली होईल.

राष्ट्रीय नागरी आरोग्य कार्यक्रम. ठाणे महापालिका हद्दीतील नागरीकांचे आरोग्य सुधारण्याकरीता महापालिकेतर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. व याकरीता बजेटमध्ये तरतुदसुध्दा करण्यात आली आहे. मी माझ्या प्रभागातील लोकमान्यनगर रुग्णालय जे आहे माझ्‍ याबरोबर मा.आयुक्तांनी पुर्ण हॉस्पीटलचा दौरासुध्दा केला होता.आणि त्यावेळी याकरीता बजेटमध्ये तरतुद करण्यात येईल असेसुध्दा आश्वासन दिले होते तेथे जो ६५ स्टाफ अपॉईन करायचा आहे त्याकरीता राज्य शासनाने जीआर दिला आहे तरी अदयाप याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली नाही. येथे जे डायलेसिस सेंटर करण्यात येणार आहे , आज तेथील आजुबाजुचा परिसर जर पाहिला तर तो पुर्णपणे स्लम एरिया असुन त्यांना हया रुग्णालयाची आवश्यकता आहे, आज त्या पुर्ण परिसरामध्ये एकही रुग्णालय नाही. आणि आज तेथे जे नविन रुग्णालय तयार आहे परंतू ते अदयाप सुरु करण्यात आले नाही. तरी ते लवकरात लवकर चालु करुन तेथे आणखीन जास्त ५० खाटा असाव्यात व त्याठि काणी डायलेसिस सेंटर चालु करण्यात यावे.

युवासेनेने मागणी केली होती की वायफाय सिस्टिम चालु करावे माझीसुध्दा मागणी आहे की ठाणे महापालिकेतर्फे चालु करण्यात यावे व याबाबत ज्या अटी व नियम असतील ते सर्व पाहुन चालु करण्यात यावे .

आज ठाणे शहरामध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट जो चालू आहे त्याबाबतसुध्दा योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. याबाबत सविस्तर सभागृहात चर्चा करुया.

त्याचप्रमाणे अनधिकृत मोबाईल टॉवर बाबत महासभेमध्ये लक्षवेधी घेण्यास तीन महिने लागले त्यानंतर जे आयुक्त होते त्यांनी मला बिनधास्त उत्तर दिले होते की दोन महिन्यामध्ये मी आपल्याला सविस्तर माहिती देतो परंतू मला अदयाप माहिती मिळाली नाही. या अनधिकृत टॉवरवर तुम्ही कारवाई केली किंवा दंड आकारला तर नक्कीच महापालिकेत जमा बाजु होणार आहे परंतू लोकांना जो त्रास होत आहे,लोकांच्या जिवाशी खेळले जात आहे,आता उच्च न्यायालयानेच एक जीआर काढला आहे तरी याबाबतची कारवाई ही लवकरात लवकर करण्यात यावी. त्याचप्रमाणे माझी अशी माहिती आहे की टॅक्स बेनिफिट नौपाडा प्रभाग समितीनंतर वर्तकनगर प्रभाग समितीचा नंबर आहे तरी माझी अशी मागणी आहे की हे समान ठेवावे कारण जेथुन टॅक्स बेनिफीट नाही आणि त्याठिकाणी भरमसाठी योजना राबविल्या जातात आणि कांही ठिकाणी त्या लोकांना काहीच मिळत नाही. म्हणजे विकास करा परंतू कोठेतरी त्याचा बॅलेन्स ठेवा कारण जेथुन आपल्याला कर मिळतच नाही तर त्यांचेकडून ती वसुल करा.

महापालिकेच्या प्रशासनाने हा जो अर्थसंकल्प मांडला आहे त्यातील किती योजना अंमलात येणार आहेत, माझ्या सूचनांचे कांय होणार आहे हे मला माहित नाही परंतू ज्याप्रमाणे मनाली ताई यांनी सांगितले की अच्छे दिन आने चाहिए,म्हणजे केंद्रात आले आहेत तर आता ठाणे महापालिकेत सुध्दा येतील. धन्यवाद.

श्रीमती एकता भोईर :

महापौर महोदय, सन २०१३-१४ चे मुळ अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करीत असताना सन्मा.महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, सन्मा.आयुक्त, सर्वपक्षिय गटनेते व सर्व सहकारी नगरसेवक,नगरसेविका,

अधिकारी वर्ग व पत्रकार कक्षातील सर्व पत्रकार व कर्मचारी बंधू व भगिनींनो, सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प २१६६ कोटी मा.आयुक्तांनी तयार केलेला व स्थायी समितीने कांही वाढ सुचवून २३५५ कोटी अंदाजपत्रक सर्वसामान्य नागरीकांना कोणत्याही प्रकारचा कर वाढ नसल्याने दिलासा देणारा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पावर ब-याच माझ्या महिला नगरसेवीकांनी व सन्मा.नगरसेवकांनी महत्वपुर्ण चर्चा घडवुन आणली त्याबद्दल मी सर्वांना शुभेच्छा देते. अर्थसंकल्प म्हणजे जमा आणि खर्चाची बाजु आलीच त्याकरीता जमेवर आपण जास्त जोर देणे गरजेचे आहे असे मला वाटते. गेल्या १ एप्रिल २०१३ पासुन स्थानिक संस्था कर लागू णाल्याने महापालिकेला मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे त्यामुळे विकास कामांनाही मोठया प्रमाणात खिळ बसली आहे हे नाकारता येणार नाही कारण महापालिकेचा मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत हे जकात होते, परंतू शासनाच्या धोरणानुसार स्थानिक संस्था कर मुंबई महानगरपालिका वगळता सर्वच महापालिकांना लागू करण्यात आला आहे परंतू आवश्यक तो प्रतिसाद व्यापारीवर्गाने न दिल्याने महापालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत झाली आहे हे आपणासमुध्दा मान्य करावे लागेल. या मा.आयुक्त साहेबांनी वसुलीबाबत कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे. मी नेहमी वृत्तपत्रात वाचते व्यापारीवर्ग स्थानिक कर भरणा वेळेवर करीत नाही व जे व्यापारी स्थानिक कर भरण्यास टाळाटाळ करता अशा व्यापा-यांवर कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे जेणेकरुन महापालिकेच्या उत्पन्नात घट होऊ नये याची दक्षता घ्यावी लागेल.

मालमत्ता कर : त्याचप्रमाणे मालमत्ता करावरसुध्दा लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. कारण ब-याचठिकाणी कांही बांधकामधारकांनी वाढीव बांधकाम केलेली आहेत त्यांच्यावर मालमत्ता कर विभागाकडून वाढीव कर आकारणी होत नसल्याने त्या जागेवरील पुन:सर्व्हेक्षण करुन वापरात असलेल्या बांधकामावर कर आकारणी होणे गरजेचे आहे, परंतू ती कर आकारणी झालेली दिसुन येत नाही. याचाच थोडक्यात एक उदाहरण म्ळणून वागळे इस्टेट मधील औदयोगिक विकास महामंडळाच्या अनेक कंपन्यांच्या पुन:बांधणीमध्ये वाढीव बांधकामे केलेली असतानाही त्यांची आपल्याकडे नोंद होणे आवश्यक आहे परंतू एमआयडीसी क्षेत्रातील बांधकाम आराखडा मंजूर करण्याची तरतुद एमआयडीसीकडेच असल्याने त्याप्रकारची कुठलीही नोंद आपल्याकडे होत नसल्याने पुर्वीच्या जुन्या बांधकामाप्रमाणे कर आकारणीचा पीसी पाहता जुन्याच दराने त्यांना कर आकारणी केली गेल्याचे दिसुन येत आहे तसेच अनेक कंपनीधारकांनी मोकळया जागेतही शेड उभारलेले आहेत त्यांचेवरही कर आकारणी करणे गरजेचे आहे असे ठाणे शहरात अनेक बांधकाम आहेत की त्याठिकाणी लाखो रुपये कररुपाने उत्पन्न महापालिकेला मिळू शकते परंतू आपल्या निष्काळजीपणामुळे महापालिकेचे नुकसान होत आहे. याकरीता आपण जातीने लक्ष दिल्यास तसेच पुन:सर्व्हेक्षण करुन वाढीव बांधकामांना कर आकारणी केल्यास महापालिकेच्या महसुल उत्पन्नात नक्कीच वाढ होऊ शकते.

पाणी खाते : महापौर महोदय, पाणी खात्याने सादर केलेल्या जमाखर्चाबाबतीत जमा १४४ कोटी ४६ लाख व खर्च २४४कोटी २९ लाख असे जमाखर्चाच्या अंदाजपत्रकात नमुद करण्यंत आले आहे हे पाहता १०३ कोटी १७ लाख जवळजवळ तुट झाल्याचे लक्षांत येते ही तुट लक्षांत घेता पाणीपुरवठा विभागाचा ढिसाळ कारभार जबाबदार आहे. पाणी पुरवठा विभागाने मीटर पध्दत अंमलात आणली असती तर पाणी पट्टी वसुलीमध्ये वाढ झालेली नक्कीच दिसुन आली असती. तसेच गेल्या दोन वर्षापासुन मीटर पध्दत अंमलात आणण्याचे प्रस्थापित असताना ही प्रत्यक्षात कारवाई होत नाही ही खेदाची बाब आहे. तसेच ठाणे शहरात अनेक ठिकाणी जलवाहिन्या जुन्या झाल्याने जागोजागी छिद्र पडून पाणी ब-याच प्रमाणात वाया जाताना दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे स्लम विभागात मालमत्ता कराच्या बिलाबरोबर पाण्याचे बिल समाविष्ट केलयाने महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते कारण ब-याचशा नागरीकांनी अनधिकृतपणे नळाची जोडणी केलेली

असल्याने महापालिकेचे नुकसान होत आहे, अशा अनधिकृतपणे नळ जोडणीधारकांवर महापालिकेच्या पाणी पुरवठा खात्याने जी अभय योजना चालु केली होती ती कांही दिवस चालु ठेऊन सर्व्हेक्षण केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल व पाणी खात्याची तुट कांही प्रमाणात भरुन निघेल असे वाटते. त्याचबरोबर नागरीकांना चांगल्याप्रकारे पाणी पुरवठा करता येईल असे वाटते.

नागरी विकास कामे : ठाणे शहरात अनेक विकास कामे प्रगतीवर आहेत परंतू वागळे इस्टेटमध्ये खुप मोठया प्रमाणात लोकवस्ती वसलेली असल्याने तेथे भव्य असे रुग्णालय उभारण्यासाठी आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे त्यासाठी आपणाकडे जागा उपलब्ध नसल्यास एमआयडीसीच्या वागळे इस्टेटमध्ये आजही मोकळी जागा असल्याचे दिसुन येते. त्या जागेची आपण रितसर मागणी करुन जागा उपलब्ध करुन घेतल्यास सदर ठिकाणी रुग्णालय उभारता येईल असे झाल्यास वागळे इस्टेटमधील सर्वसामान्य नागरीकांना मोठा दिलासा मिळेल. त्याचप्रमाणे माझ्या माहितीप्रमाणे रुपादेवी माता मैदान हे महापालिकेने ७२ लाख रुपये भरुन एमआयडीसीकडुन लिजवर घेतले होते परंतू त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची विकास कामे राबविण्यात आली नाही याठिकाणी ही आपणास अशाप्रकारच्या लोकोपयोगी योजना राबविता येतील परंतू महानगरपालिकेचे पुर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे अर्थसंकल्पात दिसुन येत आहे.

उदयान : युतीची सत्ता राज्यात असताना एमआयडीसीकडून महापालिकेला उदयान विकसित करण्यासाठी मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व धर्मवीर मा.आनंद दिघे साहेबांच्या कृपेने जागा उपलब्ध करुन प्रभाग क्र.२८, जयभवानी नगर येथे एक भव्य असे उदयान विकसित करण्यात आले आहे त्यामुळे त्या परिसरातील जेष्ठ नागरीक व सर्वसामान्य नागरीकांना या उदयानाचा उपयोग होतो. वागळे इस्टेटमध्ये एकमेव उदयान असल्याकारणाने अनेक जेष्ठ नागरीक व सर्वसामान्य नागरीक सदर उदयानात सकाळी व संध्याकाळी चालण्यासाठी येतात परंतू जॉगिंग ट्रॅक सुव्यवस्थित नसल्याने नागरीकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे तसेच योगा करण्यासाठी ही अनेक नागरीक येत असतत योगासन करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने पावसाळयात जेष्ठ नागरीकांची गैरसोय होत आहे याकरीता याठिकाणी सुसज्ज असे जॉगिंग ट्रॅक व योगासन केंद्र उभारण्यासाठी या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी अशी मी विनंती करीत आहे.

शौचालय : ठाणे शहरातील स्लम विभागातील नागरीक हे सार्वजनिक शौचालय हे एकमेव प्रात:विधीकरीता साधन असते त्यामुळे मोठया प्रमाणात सार्व.शौचालयांचा वापर करीत असतात परंतू अनेक ठिकाणी सार्व.शौचालयांची अतिशय दुरावस्था झालेली आहे. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतुदीमध्ये वाढ करावी जेणेकरुन सर्वसामान्य नागरीकांना सुविधा पुरविता येतील. विशेष म्हणजे या अर्थसंकल्पामध्ये शौचालय दुरुस्ती व शौचालय बांधणे या लेखाशिर्षकाकडे नजर फिरवली असता मंजूर कामाची बिले वजा करता नविन कामासाठी निधी शिल्लक राहत नाही असे दिसुन येते असे झाल्यास सर्वसामान्य नागरीकांना शौचालयासारख्या सुविधांपासुन वंचित रहावे लागेल असे वाटते. म्हणून मी या अर्थसंकल्पात शौचालय दुरुस्ती व शौचालय बांधण्यासाठी तरतुदीमध्ये वाढ करावी अशी आग्रही मागणी करत आहे.

तरी महापौर महोदय, मी केलेल्या सूचना विचारात घेऊन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात याचा अंतर्भाव करावा ही विनंती जयहिंद जयमहाराष्ट्र.

श्री. विलास चंदू कांबळे :

महापौर महोदय, माझ्या प्रभागाकरीता खालील कामे करण्यात यावीत.

१. ओम साईनाथ हौसिंग सोसायटी येथे गटर पायवाट बांधणे.
२. भगीरथी हौसिंग सोसायटी येथे गटर पायवाट बांधणे.
३. श्री.सुरेश कांबळे यांच्या घरापासुन ते श्री विभुती प्रकाशनंदजी विदयालय कॉंक्रीटकरणे.
४. समता हौसिंग सोसायटीलगत गटर पायवाट बांधणे.
५. लक्की वाल्मिकीच्या घरापासुन नवनाथ कांबळे यांच्या घरापर्यंत गटर पायवाट बांधणे.
६. गुप्ता यांचे घरापासुन ते किसन राजपुत यांच्या घरापर्यंत गटर पायवाट बांधणे.
७. बंन्सनारायण सिंग ते हरिदेव यादव यांच्या घरापर्यंत फुटपाथ बांधणे.
८. जय भोले मित्र मंडळ परिसरामध्ये गीतादेवी गुप्ता ते रतन केदार परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
९. साईधाम हौसिंग सोसायटी परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
१०. साईनाथ मित्र मंडळ साठेनगर या परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
११. आकाश बार गल्ली ते संत मुक्ताबाई चाळ परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
१२. श्रीमाल मेडीकल ते गुप्ता यांचे घरापर्यंतच्या परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
१३. शंकर मंदिरमागील परिसरामध्ये परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
१४. संजय कांबळे यांचे घरापासुन दाऊदभाई यांचे घरापर्यंतच्या परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
१५. शिवकृपाचाळ येथे गटर पायवाट बांधणे.
१६. अजिंक्यतारा मित्र मंडळ येथे फुटपाथ दुरुस्त करणे.
१७. जय महाराष्ट्रवॉच सेंटर ते रामा पानवाला येथे गटर व नविन फुटपाथ बांधणे.
१८. लक्ष्मीचाळ या परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
१९. अष्टविनायक चाळ या परिसरामध्ये जिमालाल कौनेजिया ते गोपाळ यांच्या घरापर्यंत गटर पायवाट बांधणे.
२०. जय अंबे रहिवासी चाळ परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
२१. पाटील चाळ या परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
२२. सतीश जनरल स्पेअर्स ते सुलभ शौचालय पर्यंत गटर पायवाट बांधणे.
२३. संतोषीमाता चाळ परिसरामध्ये गटर पायवाट बांधणे.
२४. तिरंगा हौसिंग सोसायटी येथे गटर पायवाट बांधणे.
२५. भारत डेअरी ते रोकडेताई यांच्या घरापर्यंत गटर पायवाट बांधणे.

तरी महापौर महोदय, वर उल्लेख केलेल्या ठिकाणी कामे करणेबाबत अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी जेणेकरुन नागरीकांची विकासकामे होऊ शकतील व परिसर स्वच्छ व सुशोभित होण्यास मदत होईल.

**श्री.सुधीर भगत :**

मा.महापौर महोदय, सन २०१४-१५ सालासाठी प्रशासनाने मांडलेला २१६६ कोटींचा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीने त्यामध्ये १८९ कोटींची वाढ करुन एकूण २३५५ कोटींचा अर्थसंकल्प मा.महासभेपुढे सादर केलेला आहे. अर्थसंकल्प सादर करीत असतांना मा.सभापती स्थायी समिती सभापती श्री.सुधाकर चव्हाण सो.,यांनी अनेक बाबींचा उहापोह हया ठिकाणी केलेलाच आहे. तथापी जी काही आर्थिक परिस्थिती निर्माण झालेली आहे त्या परिस्थितीवर कशा प्रकारे मात करता येईल यावर देखिल सूचना केलेल्या आहेत. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करावयाची आहे की, जकात बंद करुन LBT लागू करण्यांत आला. त्यानंतर सुरुवातीचे तीन ते चार महिने विचारविनिमय करण्यातच निघून गेले. या कालावधीत अनेक वर्तमानपत्रांमधून महानगरपालिका डबघाईला गेली अशा प्रकारची वृत्त प्रसिध्द झाली. आणि त्यानंतरही आपण वसूली करण्यासाठी जी काही ठोस पावले उचलली तो प्रयत्न वाखाणण्याजोगा आहे.

काही गोष्टी या ठिकाणी ज्यांचा या ठिकाणी मला प्रकर्षाने उल्लेख करावासा वाटतो त्या मी या ठिकाणी नमूद करु इच्छित आहे. मा.सभापती स्थायी समिती यांनी काल या ठिकाणी सभागृहात भाषण केलेले आहे. त्या अनुषंगाने मला या ठिकाणी काही सूचना कराव्याशा वाटतात त्या कितपत योग्य आहेत ते शेवटी या सभागृहाने ठरवायचे आहे.

सभापती महोदय, मागील आर्थिक वर्षाचा विचार करता मागील वर्षी LBT मधून अत्यंत अल्प प्रमाणात वसूली झाल्यामुळे महानगरपालिकेकडून अनेक ठेकेदारांची बीले अदा झालेली नाहीत. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात ही सर्व थकबाकी आपल्याला अदा करावयाची आहे. त्यामुळे स्पील ओव्हरमुळे हे चालू आर्थिक वर्षामध्ये उत्पन्नात मोठया प्रमाणात तूटच दिसून येणार आहे. जमा बाजूकडे दिसावी त्या प्रमाणात वाढ दिसत नाही. त्यामुळे मला या ठिकाणी काही खर्चाच्या बाजूंमध्ये कपात सुचवावीशी वाटते. उदा.उपवन फेस्टिवल करिता ४ कोटींची तरतूद ठेवण्यांत आली आहे त्यामध्ये कपात करण्यांत यावी. कारण तसे पाहिले तर हा एक सावर्जनिक महोत्सव असतो. हा महानगरपालिकेचा उपक्रम नाही. त्या ठिकाणी नगरसेवक देखिल जात असतात. परंतू जे निमंत्रीत असतात तेच त्या ठिकाणी जातात. सर्वच लोक काही तिथे जात नाहीत. तेव्हा अशा महोत्सवाला मदत करीत असतांना ठाणे शहरात तो महोत्सव आयोजित होत आहे, या ठिकाणी ठाणे शहराचे आणि पर्यायाने महानगरपालिकेचे नांव होत आहे आणि जाहिरात व्हावी हया दृष्टीकोनातून हा मदत निधी देत असतांना तो १ कोटी पर्यंत वगैरे दिला तर ठिक आहे. पण ४ कोटींची तरतूद ही फार मोठी तरतूद आहे अशी माझी भावना आहे.

वास्तविक पाहता, आमचा परिसर हा डोंगराळ भाग आहे. अर्थसंकल्पात डोंगराळ भागाचा निधी असा कुठेही उल्लेख नाही. महानगरपालिकेच्या सध्याच्या नगरसेवकांपैकी २५% नगरसेवक हे डोंगराळ भागातील नगरसेवक आहेत. ज्यामध्ये वागळे इस्टेट, मुंब्रा, कळवा या सर्व परिसरातील नगरसेवकांचा समावेश होतो. आणि असे असतांना नगरसेवकांच्या प्रभाग सुधारणा निधीमध्ये आपण वाढ केली आहे. त्याबाबत सर्वांनी आपले अभिनंदन केले आहे. तथापि, आमच्या या डोंगराळ भागाकरिता निधीची उपलब्धता करणे अत्यावश्यक होते. मा.महापौर महोदय, डोंगराळ भागात कामे करीत असतांना, मटेरियल, साहित्य, आदी खालून वरती न्यावे लागते. आणि यामध्ये मनुष्यबळ आणि मशिनरींचा वापर वाढल्यामुळे खर्चात वाढ होते. आणि मग अनेक वेळेला कमी बजेटमध्ये कामे करीत असतांना कामे निकृष्ट दर्जाची होत असतात. तरी डोंगराळ भागाकरिता प्रत्येकी किमान १० लाखांचा निधी दिल्यास तेथील नगरसेवक सक्षमतेने कामे करु शकतील. याबाबम मागील बोर्डात सन्मा.सदस्य आणि विरोधी पक्ष नेते श्री.देवराम भोईर हयांनी देखिल सूचना केली होती. त्यानुसार निधी देण्यांत आला होता आणि त्या निधी अंतर्गत कामे देखिल झालेली आहेत.

मा.महापौर महोदय, मा. सभापती महोदय यांनी व्यायामशाळांच्या साहित्याचा उल्लेख त्यांच्या भाषणामध्ये केलेला आहे. प्रभागनिहाय व्यायामशाळेच्या साहित्याचे वाटप केले जाणार आहे. या ठिकाणी मला एक प्रश्न उपस्थित करावयाचा आहे की, आमच्या प्रभागात व्यायामशाळाच नाही तर या व्यायाम साहित्याचे आपण कसे काय वाटप करणार ? तेव्हा या बाबत देखिल प्रकर्षाने विचार होणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, जमेच्या बाजूवर बोलत असतांना, काल देखिल सभागृहात अर्थसंकल्पावर चर्चा झालेली आहे. अनेक सदस्यांनी आणि आमच्या सदस्य भगिनींनी देखिल चर्चा केली. त्यावेळी टॅक्सचा मुद्दा चर्चेत आलेला आहे. सन्मा.सदस्य श्री.उमेश पाटील हयांनी देखिल हा मुद्दा उपस्थित केला आहे. यामध्ये प्रकर्षाने नोंद करण्यांत आलेली आहे की, मालमत्ता करात मोठया प्रमाणात घट झालेली आहे. स्थायी समितीमध्ये देखिल या मुद्दयावर आम्ही आमचे विचार मांडलेले आहेत. मा.महापौर महोदय, मुंब्रा परिसरात २७६ इमारती अशा आहेत की मागील पाच वर्षापासून हया इमारतींना टॅक्स लावलेलाच नाही. आणि यामुळे एका वर्षात पाच कोटींचे तर पाच वर्षात २५ कोटींचे ठाणे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. या नागरिकांना आपण सुविधा देत आहोत, महानगरपालिकेचे कर्तव्य म्हणून त्या सुविधा देत आहोत. मा.स्थायी समितीच्या सभेत देखिल यावर अनेक वेळेला चर्चा झालेली आहे. स्थायी समितीची सभा स्थगित देखिल झालेली आहे. आणि असे असतांना उत्पन्नात घट होत आहे. यावर कोणत्या अधिकाऱ्यांवर आम्हाला ताशेरे ओढावयाचे नाहीत. मा.महापौर महोदय, २७६ इमारतींबरोबरच १४० घरे अशी आहेत की ज्यांच्यावर टॅक्स आकारलेला नाही ही माहिती टॅक्स विभागाकडून मिळाली आहे. हया घरांना टॅक्स लागला असता तर अर्थसंकल्पात ही घट आली नसती.

सार्वजनिक संडासांचे बाबतीत आणि युरिनल्स बांधण्यासाठी आपण वेगवेगळे हेडस् ठेवलेले आहेत. परंतू हे सार्वजनिक संडास आणि मुताऱ्या बांधत असतांना ते आवश्यक त्या ठिकाणी बांधले न जाता इतरत्र बांधले जात आहेत अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. एक कोटींपेक्षा अधिक रकमेच्या कामासाठी आपण थर्डपर्सन ऑडिट ठेवले आहे हे सत्य आहे का ?

मा.महापौर महोदय, पाणी पुरवठा व्यवस्थापनामध्ये ६ कोटी ५५ लाखांची तूट आहे. हा विभाग असा आहे की, या ठिकाणी बजेट नेहमीच वाढीव लागत असते. आता अनेक ठिकाणी जलवाहिन्या ज्या जुन्या आहेत. मागील बोर्डात निवडून आलेल्या सदस्यांच्या प्रभागांमध्ये पाणीपुरवठयाच्या लाईन हया बदलून दिलेल्या आहेत. अनेक प्रभागांमध्ये पाण्याच्या लाईन्स जुन्या आहेत. त्या बदलणे अत्यावश्यक आहे. अशा ठिकाणी हया लाईन्स बदलण्याकरिता सदस्यांना बजेट उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. पण हया ठिकाणी फिक्स बजेट ठेवण्यांत आलेले आहे. मा.महापौर महोदय, नविन रस्त्यामध्ये जलवाहिन्या टाकण्याचे प्रस्ताव आपण घेतले आहेत. परंतू ज्या जुन्या जलवाहिन्या आहेत त्या करिता बजेटमध्ये तरतूद करणे अत्यावश्यक आहे. तरी जुन्या जलवाहिन्या दुरुस्तीचे हेड निर्माण करणे आवश्यक आहे. त्यामुळे माझी अशी सूचना आहे की, पाणी खात्याकडे असलेल्या बजेटमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे.

मा.महापौर महोदय, दर वर्षी आपण नाले सफाईवर खर्च करीत असतो. श्री.लाला साहेब यांचेकडे आम्ही नाल्याचा एक चांगला डायग्राम बघितला होता. नाल्याच्या दोन्ही बाजूला बेडींग करुन मध्ये डक्ट दयायचा. जेणेकरुन पाण्याचा जो फलो आहे तो सर्व कचरा वाहून नेतो. मा.महापौर महोदय, आमच्या डोंगराळ परिसरामध्ये नाले आहेत ते फलॅट बेडचे आहेत. नाल्यामध्ये कचरा टाकण्याची नागरिकांची सातत्याने मानसिकता असते. आणि तो कचरा नाल्यात वर्षानुवर्षे भरला जात असतो. नाले सफाईकरिता आपण यंत्रणा राबवितो. नाल्यांची सफाई करतो. परंतू पाहिजे तेवढया प्रभावीपणे हे काम होऊ शकत नाही. तरी माझी विनंती आहे की, पायलट बेसीसवर जर आपण नाले घेतले आणि त्याला बेन्ट कल्व्हर्ट ज्याला म्हणता येईल, तसे केले तर जो कचरा आहे तो मध्यभागी येईल आणि पाण्याचे प्रेशरने तो कचरा वाहून येईल. आणि पावसाळयाच्या पूर्वी नाले सफाईवर होणारा खर्च कमी होईल. नुसता खर्च न होता प्रभावीपणे त्याचा इफेक्ट आपल्याला दिसून येईल. UTWT चा पायलट प्रोजेक्ट आपण राबविला होता त्या धर्तीवर आपण हा नाल्यांचा

पायलट प्रोजेक्ट देखिल एखादया प्रभागात राबविल्यास त्याचा फायदा होऊ शकेल. मा.महापौर महोदय दर वर्षी नाले सफाईवर आपण करोडो रुपये खर्च करीत असतो. परंतू हा खर्च करीत असतांना ख-या अर्थाने नागरिकांना त्याचा जो उपयोग व्हायला पाहिजे तो होत नाही. नाल्यांची उंची लांबी, खोली किती साफ करायची ते आपण लिहीलेले असते. परंतू यू बेन्ट कल्व्हर्ट जर आपण टाकला तर पाण्याच्या प्रेशरने हा सगळा नाला आपल्याला साफ करता येईल. एक दोन प्रभाग आपण निवडा, मी तर म्हणतो की पायलट प्रोजेक्टसाठी आपण माझ्या प्रभागाचा जरुर विचार करावा. हा प्रोजेक्ट जर सक्सेस झाला तर माझ्या प्रभागात होईल आणि प्रोजेक्ट फसला तर तो माझ्या प्रभागात फसेल. प्रभागातील नागरिकांकडून जे काही उत्तर मिळायचे असेल ते मला मिळेल. परंतू पायलट प्रोजेक्ट म्हणून आपण तो घ्यावा. कारण हया संकल्पनेनुसार नाले सफाईवरील आपला खर्चाचा ताण कमी होईल.

मा.महापौर महोदय, ठाणे शहरात अनेक विहीरी आहेत. आता काळ असा आलेला आहे की, प्रत्येक सोसायटीमध्ये आपल्याला विहीरी बांधाव्या लागतील. सद्य:स्थितीत वाढत्या डांबरीकरणामुळे आणि कॉंक्रिटीकरणामुळे जमिनीमध्ये पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. इतकेच नव्हे तर रेन वॉटर हार्वेस्टिंगने पाणी जिरवण्यामध्ये देखिल या कॉंक्रिटीकरणामुळे अडथळे येत आहेत. त्यामुळे जमिनीखाली पाणी जिरवणे आणि विहीरींना पाणी उपलब्ध होणे हे अशक्यप्राय झालेले आहे. त्यामुळे शहरात वाढत्या पाणी समस्यांवरील प्रभावी उपाय म्हणून आपल्याला विहीरींकडे पुन्हा नव्याने पहावे लागणार आहे. आणि ज्या विहीरी बंद आहेत त्यांना पुन्हा नव्याने सफाई करुन वापरात आणावे लागणार आहे.

मा.महापौर महोदय, सद्य:स्थितीत प्रवेशद्वाराकरिता निधी उपलब्ध करण्याचे आपण बंद केलेले आहे.तरी देखिल मुलूंड ठाणे हद्दीवर, आनंद नगर चेक नाका या ठिकाणी प्रवेशद्वार आपण बनविले आहे. तरी नाशिक आणि पुणे हद्दींवर आपण प्रवेशद्वार बांधावे जेणेकरुन महानगरपालिका काय सुविधा देत आहे याची जाण नागरिकांना होऊ शकेल. आपण केलेली कामे लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तरी पुणे आणि नाशिक हया दोन रस्त्यांवर प्रवेशद्वार उभे करावे अशी माझी सूचना आहे.

मा.महापौर महोदय, आपले सन्मा.सदस्य श्री.संजय घाडीगांवकर हयांनी या ठिकाणी आपले भाषण करीत असतांना म्हटले आहे की आयुक्त बदलले की विचार बदलतात. आम्ही नव्याने हया सभागृहात आलो होतो. त्यावेळेला मोनो आणि मेट्रोचे स्वप्न बघितले होते. आज ते स्वप्न साकार होण्याच्या मार्गावर आहे. ते लवकरात लवकर पूर्णत्वास जावे जेणेकरुन भावी पिढीला त्याचा उपभोग घेता यावा. आणि याकरिता जो कारशेडचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा.

मा.महापौर महोदय, सर्व्हीस रोडवर आपण करोडो रुपये खर्च करतो आहोत. मा.महापौर महोदय, आपण स्वत:ला प्रेझेंट करण्याकरिता जसे कपडे वापरतो त्या कपडयांवरुन आपली समाजात किंमत होते. त्याच धर्तीवर मी म्हणेन की आपल्या रस्त्यांवरुन आपल्या शहराची देखिल ओळख पटत असते. मा.आयुक्तांनी प्रत्यक डीसीपी झोन यांचेशी चर्चा करुन या सर्व्हीस रोड बाबत तोडगा काढण्याचा निर्णय घेतला आहे. मी विनंती करेन की मा.आयुक्त महोदय हे लवकरात लवकर व्हावे. ट्रॅफिक आणि सिग्नलमध्ये गाडया जास्त वेळ अडकून पडू नयेत हया उद्देशाने आपण सर्व्हिस रोड बनविले होते. परंतू आता सर्व्हीस रोडवरील गाडया डायरेक्ट सिग्नलवर येऊ लागल्या आहेत. आणि त्यामुळे सिग्नलवर फार मोठ्या दुर्घटना होत आहेत. तरी त्यामुळे सर्व्हिस रोडवरील अपघातांना आळा बसण्याकरिता लक्ष देणे गरजेचे आहे. सर्व्हीस रोडवर प्रत्येक ठिकाणी त्या त्या गावात जाण्याकरिता टर्न दिलेले आहेत. परंतू तसे न होता सर्व्हिस रोडवर गाडी अचानक थांबते आणि मागून येणारी गाडी हया गाडीवर आदळते. प्रत्येक गावात जाण्याकरिता सर्व्हिसरोडवर वळण असेल, प्रत्येक रोड येऊन सर्व्हीस रोडला मिळेल आणि प्रत्येक सर्व्हिस रोड हा एक टर्नवरती हायवेला मिळेल अशी सर्व्हीस रोडची संकल्पना होती. परंतू आता सगळयाच गाडया सर्व्हिस रोडवरुन सिग्नलला येऊ लागल्या आहेत. आणि त्यामुळे अपघातांची संख्या देखिल वाढू लागली आहे.

मा.महापौर महोदय, महानगरपालिकेत ३२ खेडी विलीन झाली आहेत. त्याच्यानंतर महानगरपालिकेकडून दुर्लक्ष झाले. शहर विकास विभागाचे उत्पन्न कमी झाले त्याला कारण शहर विकास विभागच आहे. कारण या ३२ खेडयांमध्ये जर आपण रस्ते दिले असते तर त्यांचा देखिल विकास झाला असता, त्या ठिकाणी उद्योजक येऊन चांगल्या इमारती उभ्या रहातात. आणि व्यवसायाची दारे उघडी होतात. खारेगांव हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. या ठिकाणी आपण उत्तम प्रकारे चार पदरी रस्ते दिले. त्यामुळे तेथे मोठया प्रमाणात डेव्हलपमेंट झाली आहे. शहर विकास विभागामार्फत दिवा आणि दातिवली यांसारख्या गावांकडे पूर्णतः दुलक्ष झालेले आहे. या परिसराकरिता जे रोड देणे अपेक्षित होते त्याकरिता बजेटमध्ये तरतूद करण्यांत येऊन या विभागातील रस्ते करणे खरोखरच गरजेचे आहे. याकडे देखिल लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

मा.महापौर महोदय, फलायओव्हर या ठिकाणी घेतलेले आहेत, तशा प्रकारचे फलायओव्हर मुंब्रा विभागात आत्माराम चौक हया ठिकाणी पाहिजे आहेत. तशा प्रकारची तरतूद करण्यांत यावी.कारण सकाळच्या वेळेस आमच्या विभागातील मुलांना फार मोठया प्रमाणात वहातूक कोंडींचा सामना करावा लागतो. आत्माराम चौक हया परिसरात आपण फलायओव्हर तयार केल्यास मोठी वहाने फलायओव्हर वरुन जाऊ शकतील आणि खालच्या रस्त्यावरुन नागरिकांना आणि लहान वहानांना ये-जा करणे सोपे होईल.

मा.महापौर महोदय, गेल्या बजेटमध्ये हॉस्पिटल करिता तरतूद ठेवण्यांत आलेली आहे. हॉस्पिटल करिता जागा उपलब्ध आहे. नवनियुक्त खासदारांनी आमच्या विभागाला भेट देऊन या परिसरात हॉस्पिटल उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्याचप्रमाणे मा.जिल्हाप्रमुखांनी देखिल याकरिता तरतूद राखीव ठेवण्यांचे आश्वासन दिलेले आहे. आमच्या परिसरात स्टेशनसमोर आणि मित्तल हॉस्पिटल समोर असे हॉस्पिटल करिता दोन भूखंड आरक्षित आहे. त्याकरिता आमच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. आपण देखिल त्यामध्ये लक्ष घातलेले आहे.तरी हे काम पूर्णत्वास न्यावे अशी आपणांस विनंती करतो.

तसेच आयआयटीसाठी जागा निश्चित करण्यांत आलेली आहे त्याकरिता देखिल आपण पाठपुरावा करुन एक भांडवली रक्कम निधी उपलब्ध सुरुवात करण्यांत यावी. धन्यवाद !

**सौ.विमल भोईर :**

मा.महापौर महोदय,मा.उपमहापौर सो.,मा.सभापती स्थायी समिती, मा.आयुक्त सो., मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते सन २०१३-१४ चे सुधारीत व सन २०१४-१५ च्या मूळ अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने मी बोलत आहे.

मा.महापौर महोदय, आपल्या ठाण्यामध्ये संस्थेतर्फे झुणका भाकर केंद्र बरीच आहेत. सद्यःस्थितीत ही सर्व झुणकाभाकर केंद्र बंद आहेत. ठाणे महानगरपालिकेने ही सर्व झुणका भाकर केंद्र महिला बचत गटास चालविण्याकरिता दिली तर मला वाटते की महानगरपालिकेला ब-यापैकी कर बचत करता येईल, व महिला बचत गटाच्या सदस्यांना देखिल उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल. तरी माझ्या या सूचनेचा अंतर्भाव करण्यांत यावा ही विनंती.

**मा.महापौर :**

जेवणाची सुट्टी करण्यांत येत आहे. ठिक ३.०० वाजता पुन्हा सभा सुरु होईल.

**(जेवणाच्या सुट्टीनंतर ४.१५ वाजता सभा सुरु होते.)**

**श्रीम. संध्या मोरे :**

मा. महापौर साहेब, मा.उप महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.स्थायी समिती सभापती व सर्व. सन्मा.नगरसेविका व नगरसेवक.

मा.महापौर महोदय, सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प सादर करण्यांत आला आहे. हा अर्थसंकल्प ठाणेकरवासियांच्या सोयी-सुविधांमध्ये सुधारणा करेल अशी अपेक्षा मी करते. हया अर्थसंकल्पात काही हरकती-सूचना मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

मा.महापौर महोदय, सर्वप्रथम मालमत्ता कर, पान क्र.७ वर मालमत्ता करासबंधात माहिती आहे. या वर्षी ३३५ कोटी उत्पन्न अंदाजित आहे. प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवला तर हे उत्पन्न आपण अजूनही वाढवू शकतो. माझ्या प्रभागातील बहुतेक सगळयाच इमारती हया अनधिकृत आहेत. त्यापैकी काही इमारती पागडी पध्दतीवर तर काही इमारती ओनरशिप बेसिसवर आहेत. त्यामुळे बहुतेक करुन मालक व भाडेकरु यांच्यात वाद असल्यामुळे मालमत्ता कर हा वेळेवर भरला जात नाही. मालमत्ता कर नावावर नसणे, रहिवाशांची अव्यवहारीक धोरण आणि आपल्या अधिका-यांचे असहकार्य यामुळे अनेक वेळा वाद निर्माण होऊन मालमत्ता कराचा भरणा केला जात नाही. या संदर्भात मी वेळोवेळी विचारणार केलेली आहे. मागच्या वर्षीसुध्दा या संदर्भात मी बजेटमध्ये बोलले होते की, मालमत्ता करासंदर्भात सुटसुटीत धोरण ठेवले पाहिजे. ब-याच किचकट तरतूदी करायला नागरिकांना भाग पाडले जाते. त्यामुळे नागरिक कंटाळा करतात आणि मालमत्ता कर भरत नाहीत. रहिवाशी हे स्वतंत्र आणि स्वतःच्या नांवबर मालमत्ता कर भरण्यास तयार आहेत. पण मनपा तयार नाही. थकबाकी चालू वर्षाचा कर भरुन देखिल त्यांना नविन चालू आर्थिक वर्षाचे स्वतःच्या नावावे मालमत्ता कर लावून दिला जात नाही. याबाबतीत मी स्वतः देखिल मा.आयुक्त साहेबांशी बोलले होते. तरी सुध्दा त्याबाबत कोणताही विचार केलेला नाही. मालमत्ता कराच्या थकबाकीची सविस्तर आकडेवारी काय आहे आणि ही थकबाकी कमी करायची असेल तर काय उपाययोजना केल्या पाहिजेत या दृष्टीने सर्वांनी विचार करुन त्याबाबत अंमलबजावणी केली पाहिजे.

पाणी पुरवठा कर :-

मा.महापौर महोदय, अनेक झोपडयांना पाणी पुरवठयाचा टॅक्स लागलेला नाही. मागच्या वर्षी अभय योजने अंतर्गत ज्या घरांना पाणी पट्टीचा टॅक्स लागलेला त्यांच्याकडे अजूनपर्यंत ती बिले पोहचलेली नाहीत. अजून ब-यास झोपडयांना पाणी पट्टी टॅक्स लागणे बाकी आहे. त्यामुळे माझी अशी विनंती राहिल की, परत अभय योजना चालू करण्यांत यावी. मा.महापौर महोदय, मालमत्ता कर आणि पाणी पट्टी वसूल करणा-या कर्मचा-यांना इलेक्शन डयुटी आणि इतर डयुटी दिल्या जातात त्याचा परिणार आपल्या टॅक्स वसूलीवर होतो. त्यामुळे तसे न होता त्यांना त्या डयुटीमधून मोकळीक दयावी अशी मी विनंती करते.

शिक्षण मंडळ :-

मा.महापौर महोदय, ठाणे महापालिकेच्या सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात शिक्षणावरती १६३.९४ कोटी रुपये खर्च अंदाजित आहे. ठामपाकडून शिक्षण मंडळास अनुदान मिळते. या अनुदानातून मोठा हिस्सा शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन अदा करण्यासाठी खर्च होतो. त्याचप्रमाणे खाजगी शाळांना सुध्दा आपण अनुदान देतो. परंतू हया खाजगी शाळा सरकारमान्य अनुदानीत शाळा आहेत. मात्र या सभागृहाच्या निदर्शनास मी आणू इच्छिते की, हया खाजगी शाळा दरवर्षी जेंव्हा नवीन प्रवेश देतात त्यावेळी ते नागरिकांकडून भरमसाठ प्रमाणांत डोनेशन्स घेतात आणि हयाच्यावरती आपल्या शिक्षणमंडळाचा कोणताच अंकूश नाही. शिक्षणमंडळातील अर्थसंकल्पामध्ये जास्त खर्च केला जातो तो शाळांतील साफसफाईवर केला जातो तरी सुध्दा आपल्या शाळांतील साफ-सफाई शुन्य गुणांवर आहे. आपल्या शाळांमध्ये बाथरुम-टॉयलेट हा परिसर अतिशय अस्वच्छ असतो. या सभागृहातील बहुतेक सगळे नगरसेवक माझ्या या मताशी सहमत असतील. तसेच शिक्षणावर देखिल आपण बराचसा खर्च करतो. मुलांना आपण ब-याचशा सोयी-सवलती देतो. परंतू शिक्षणाचा दर्जा मात्र खालावलेला असल्याचे दिसते. कारण ब-याचशा शिक्षकांना इलेक्शन डयुटी दिलेल्या असतात. त्यामुळे वर्गावरील त्यांची उपस्थिती ही

कमी जाणवते. त्यामुळे त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो. ही मुल जेंव्हा दुस-या शाळेमध्ये प्रवेश घ्यायला गेली तर मनपातील मुल म्हणून त्यांना प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे शिक्षकांच्या शिक्षणपध्दतीवर कुठेतरी अंकूश ठेवला पाहिजे. मा.महापौर महोदय, त्यासाठी मी अशी मागणी करते की, आपल्या प्रत्येक शाळेमध्ये सी.सी. कॅमेरे बसविण्यात यावेत. त्यामुळे शिक्षक काय शिक्षण देतात यावर लक्ष ठेवू शकतो.

परिवहन सेवा :-

मा.महापौर महोदय, मला तुम्हाला अशी विनंती करायची आहे की, तुम्ही एखादया दिवशी सकाळी सात आणि दुपारी १२ ते १२.३० वाजता या दरम्यान एक फेरी मारावी. तसेच संध्याकाळच्या वेळेस सॅटीस, गावदेवी मैदान इथे ६ ते ९ या वेळेमध्ये जावे. याबाबत टेकाळे साहेबांना मी वेळोवेळी सांगितले आहे की, तुम्ही किसननगर भागामध्ये एखादी फेरी मारा. सकाळच्या वेळेमध्ये तिथे एकही बस नसते आणि बस नसल्यामुळे टीएमटीचा सगळा प्रवासी वर्ग हा खाजगी प्रवास शेअररिक्षाकडे वळला असून त्यामुळे टीएमटीचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. मा.महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब, आता हया गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे की, बसेस जास्तीत जास्त दुरुस्त करुन रस्त्यावर आणल्या पाहिजेत. काही काही बसेसची फक्त काच तुटलेली आहे आणि बस जागेवर उभी आहे. तरी अशा बसेस लवकरांत लवकर दुरुस्त करुन त्या लोकांच्या सेवेसाठी दिल्यातर त्यामुळे महापालिकेला पैसा मिळू शकतो.

मा.महापौर महोदय, मी आभारी आहे की, हया वेळेस वागळे विभागाचे अर्थसंकल्पात नांव आहे. वागळे विभागात नाटयगृह, शॉपिंग प्लाझा, क्रिडा संकूल देण्यात आलेले आहे. पण माझी अशी मागणी आहे की, वागळे विभाग हा भरपूर लोकवस्ती असलेला भाग आहे आणि या ठिकाणी एकही हॉस्पीटल नाही. याबाबत आम्ही केंद्रे साहेबांशी चर्चा केली आहे. आणि केंद्रे साहेबांनी सगळयांनाच असे आश्वासन दिले आहे की, तुमच्या प्रभागात ५० खाटांचे किंवा १०० खाटांचे हॉस्पीटल करु. मी या ठिकाणी आग्रहाने सांगेन की, वागळेइस्टेटला हॉस्पीटलची नितांत गरज आहे. कारण आमच्याकडील सगळे रुग्ण आम्हाला सिव्हील हॉस्पीटल किंवा कळवा हॉस्पीटलला पाठवावे लागतात. त्यामुळे माझी विनंती आहे की, वागळे इस्टेटमध्ये जिथे मोकळी जागा असेल किंवा जिथे एमआयडीसीचा एरिया असेल तिथे हॉस्पीटल जर बांधता आले तर बांधावे कारण वागळेला खरंच हॉस्पीटलची नितांत गरज आहे. मला वाटते आमचे बाकीचे नगरसेवक सुध्दा मला यासाठी सहाय्य करतील. मी या ठिकाणी हॉस्पीटलची मागणी का करते तर आमच्या भागासाठी जे आरोग्य केंद्र आहे ते वस्तीपासून फार लांब आहे. वस्तीमध्ये नाही श्रीनगर साईटला आहे. त्यामुळे बरेचसे नागरिक आरोग्यकेंद्रात जात नाहीत. तिथली परिस्थिती अशी बेकार आहे. लोक तिथे जायला सुध्दा तयार होत नाहीत. तिथली वेळ सुध्दा विचित्र आहे. सकाळी ते दहा ते दुपारी बारा वाजेपर्यंत आणि बारानंतर गेलात तर आरोग्यकेंद्र बंद झालेले असते. याबाबत मी अशी मागणी करते की, सदरचे आरोग्यकेंद्र दोन्ही सत्रामध्ये चालू ठेवावे. मा.महापौर महोदय, मी ज्या काही सुचना केल्या आहेत त्या थोडया फार अंमलात येतील अशी अपेक्षा करते आणि माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र!

**श्रीम. नम्रता भोसले :-**

मा.महापौर महोदय, मा.उप महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब, मा. सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.स्थायी समिती सभापती, मा.सर्व नगरसेवक आणि इथे उपस्थित सर्व अधिकारी वर्ग.

मा.महापौर महोदय, यावर्षी आमचे तिसरे बजेट आहे. ज्यावर आम्ही काही भाष्य करणार आहोत. या ठिकाणी वारंवार ज्या सुचना मी करत होते. त्यापैकी दोन कामासाठी थोडाफार का होईना निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे मी आपली खुप-खुप आभारी आहे. मा.महापौर महोदय, मला निधी उपलब्ध करुन दिलेला आहे परंतू तो अंमलात आणण्यासाठी आपल्याला ठोस पावले उचलायची आहेत. आमच्या प्रभागात ज्यावेळ मानकर मॅडम सहा.आयुक्त होत्या त्यावेळे पासून मी मागणी करत आहे की, तिनहात नाक्याला ज्या टप-या आहेत त्या हटविल्या पाहिजेत कारण तिथे खुप विचित्र प्रकारचे धंदे चालू असतात. आपल्या ठाणे महापालिकेचा चेहरा चांगला आहे तो विद्रुप होत चालला आहे. त्या ठिकाणी शॉपिंग प्लाझा

बांधण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असून त्यासाठी बजेट देखिल मिळालेले आहे. मा.महापौर महोदय, जोपर्यंत त्या ठिकाणच्या अनधिकृत टप-या हटविल्या जाणार नाहीत तोपर्यंत कोणत्याही प्रकारचे शॉपिंग कॉम्प्लेक्स तिथे होऊ शकत नाही. त्या ठिकाणी मोठी कारवाई करावी लागणार आहे. यापूर्वी वागळेप्रभाग समिती मधील दोन अधिकारी आणि मी स्वतः त्या ठिकाणी उपस्थित होते त्यावेळी छोटी कारवाई करुन काही टप-या आम्ही हटविल्या होत्या. परंतू दोन दिवसानंतरच त्या पुन्हा तिथे थाटल्या गेल्या. त्यामुळे तशी कारवाई करण्यात अर्थ नाही. हया ठिकाणी जर शॉपिंग प्लाझा बांधायचा असलेतर त्यासाठी सर्वप्रथम आधी हे पाऊल उचलणे आवश्यक आहे आणि ही कारवाई झाली तरच हया जागेवर शॉपिंग प्लाझा बांधता येईल. अन्यथा जो निधी मिळाला आहे तो परत इतरत्र कुठेतरी वापरला जाईल.

यानंतर सर्वात महत्वाचे म्हणजे आपले जे एल.बी.टी. धोरण आहे ते धोरण सध्या कोणत्या स्थितीला आहे ते माहिती नाही. ते आल्यापासून डळमळीतच आहे. मा.मुख्यमंत्री साहेबांनी सांगितले की, आता ते रद्द करणार आहेत. पण या डळमळीत असलेल्या एल.बी.टी.धोरणामुळे ठाणे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डळमळीत झालेली आहे आणि ती स्थिर करण्यासाठी आपण काहीतरी ठोस प्रयत्न करावेत. म्हणजेच हया एलबीटी संदर्भात काही तो एकदाचा निर्णय घ्या करा किंवा जकात धोरण नव्याने सुरु करा. कारण जकात होती तेंव्हा आपली महापालिका एक चांगले उत्पन्न कमवत होती. एल.बी.टी.वर अवलंबून नव्हती. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, तुमचे जे काही धोरण आहे ते निश्चित करा. लवकरांत लवकर काहीतरी एक मार्ग निश्चित करा. कारण जे व्यापारी जकातही भरत नाहीत आणि एल.बी.टी. सुध्दा भरत नाहीत त्यांची चांदी होत चालली आहे आणि महापालिकेचे उत्पन्न कमी होत चाललेले आहे. त्यामुळे याबाबत लक्ष देणे खुप गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, मी ठाणे महानगरपालिकेचा नकाशा तितकासा अभ्यासून बघितलेला नाही. परंतू माझ्या माहितीप्रमाणे आपल्या ठाणे महापालिकेत आजूबाजूला काही छोटी-छोटी गाव आहेत. ती प्रतिक्षेत आहेत की, ठाणे महापालिका आपल्याला सामावून घेईल. जर आपल्याला तसे करता आले तर आपण त्यांच्यासाठी काहीतरी म्हणजे विद्युत सेवा, पाण्याची व्यवस्था, अगदी मुलभूत ज्या सुविधा आहेत ज्या आपण त्यांना उपलब्ध करुन देऊ शकू.

घनकचरा व्यवस्थापन :-

मा.महापौर महोदय, घनकचरा व्यवस्थापन हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. मला हे कळत नाही की, दर वर्षी महापालिका घनकचरा व्यवस्थापनावरएवढा खर्च का करते? कारण आपल्या ठाण्यात किंवा मुंबईत अशा कितीतरी संस्था आहेत ज्या आपल्याकडून कचरा घेऊन जाण्यासाठी उत्सुक असतात आणि त्या बदल्यात आपल्याला पैसेही दयायला तयार असतात. माझा जो कोपरीकडचा अर्धा भाग आहे तिथे खुप मोठे संकट येण्याच्या मार्गावर आहे. सन १९६८ पासून कोपरी येथे डंपिंग ग्राऊंड चालू झालेले आहे. आणि प्रतिदिन तिथे चार हजार हेक्टर कचरा नेला जातो आणि त्या कच-यातून कार्बन डायऑक्साईड आणि अनेक विषारी वायू तयार होतात. आणि ते आपल्या आरोग्याला अतिशय घातक असतात. त्यामुळे आमच्या कोपरीतील नागरिकांना एका मोठया संकटाला सामोरे जावे लागत आहे आणि तसे होऊ नये एवढी आमची इच्छा आहे. तरी या डंपिंग ग्राऊंडबाबत काहीतरी पर्याय निघाला पाहिजे. हे बजेटच्या वेळी सांगण्याचे कारण असे की, हा कचरा उचलण्यास एखादया संस्थेस दिला तर त्याचा काहीतरी सदुपयोग होईल. आपल्याकडे शुन्य कचरा मोहिम म्हणून एक बुकलेट दिले जाते की, शुन्य कचरा मोहिमेसाठी प्रॉपर्टी टॅक्स कमी करुन देतो वगैरे परंतू वस्तूस्थिती तशी नाही. म्हणजे अंमलबजावणी करायला कोणीही तयार नसते. हया चुकीच्या गोष्टी आहेत. तरी घनकचरा व्यवस्थापनाचा एवढा मोठा खर्च कमी करुन एखादया चांगल्या संस्थेला आपल्या हाताशी घेऊन म्हणजे मी असे म्हणत नाही की, एकाच वेळी संपूर्ण ठाणे सुरु करावे. पण काही ज्या ठिकाणी सोसायटी एरिया आहे तिथून सुरुवात करा आणि हळूहळू करुनच आपण एखादी सुधारणा करु शकतो. कोणतीही गोष्ट अशी नसते की, घेतली आणि लगेच चालू केली. एखादया प्रभाग घ्या किंवा एखादा विभाग घ्या आणि त्यापासून सुरुवात करा. त्यातून जो पॉझीटीव्ह रिस्पॉन्स मिळेल त्यानुसार आपण हळूहळू ठाणे महापालिकेमध्ये ती योजना राबवू शकू. मला वाटते ही खूप महत्वाची योजना आहे. माझ्या माहितीप्रमाणे असं ब-याच ठिकाणी केलेले आहे. कर्नाटकमध्ये विग्वेक यादव आयुक्त म्हणून

होते त्यांनी तिकडे कुणाचा प्रभाग सर्वात स्वछ आणि सुंदर असेल अशी एक स्पर्धा ठेवली होती. आणि कचरा विकत घेऊन एक चांगली योजना राबवली. अशा ब-याच गोष्टी आहेत की, ज्या आपण करु शकू. हया अर्थसंकल्पात गांडूळ खत किंवा हया सगळया खतांवर इतका कमी निधी ठेवलेला आहे. मला असे वाटते की, त्या खतांवर जास्त निधी घेतला आणि घनकचरा उचलण्या वरचा निधी कमी केला तर जास्त फायदेशीर ठरेल.

महिला व बालकल्याण योजना :-

मा.महापौर महोदय, अजून आपल्या विशेष समित्या स्थापन झालेल्या नाहीत. पण एक चांगले झाले होते की, ज्यावेळी आपल्याला महिला व बालकल्याण समितीसाठी योजना अंमलात आणायच्या होत्या त्यावेळी मा.आयुक्त साहेबांनी आम्हला महिला सदस्यांना त्यांच्या दालनांत चर्चेसाठी बोलाविले आणि विचारले होते कोणत्या योजना तुम्हाला चांगल्या वाटतात त्याबाबत त्यांनी आमच्या बरोबर चर्चा केली होती. त्यावेळी आम्हाला समाधान लाभले होते की, महिला बालकल्याण योजनांसाठी आम्हाला गृहित धरण्यात आले. मा. महापौर महोदय, महिला व बालकल्याण योजनेबाबत मला एवढेच बोलायचे आहे की, यावेळी २० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यातून किती रक्कम प्रत्येक महिलेला मिळू शकेल हा खुप मोठा प्रश्न चिन्ह आहे. या संदर्भात ज्यावेळी आम्ही चर्चा केली होती तेंव्हा मी एक मुद्दा उपस्थित केला होता की, तुम्ही महिलांना एक क्वॉलिटी प्रशिक्षण दया. त्या ठिकाणी उदयोगभवन असेल. माझे लहानपण महिमला गेले. त्या ठिकाणी एक मोठे उदयोग भवन होते. त्या भागातील कोणतीच महिला उपाशी नसायची. त्या तिथल्या उदयोगभवनामध्ये दोन-तीन तास काम करायच्या. त्यातून मिळालेले उत्पन्न कुठे संपवायचे याचे त्यांना टेंशन नसायचे. कारण त्या उदयोगभवनामध्ये मार्केटींग डिपार्टमेंट वेगळा होता. त्यांना काम केल्याचा मोबदला पुरेसा मिळायचा. असे एखादे काहीतरी चालू करावे. हया २० कोटीची तरतूद हया दिशेला नेली तर महिलांना सक्षम आणि त्यांचे सबळीकरण करण्यास आपण मदत करु शकू असे माझे म्हणणे आहे. आपण ज्या घरघंटी किंवा शिलाई मशिन देतो त्याचा वापर महिला कालांतराने स्वतःच्या घरगुती वापरासाठीच करतात. त्यामुळे त्यातून त्यांना कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. तसेच आपले जे धोरण आहे ते सुध्दा साध्य होत नाही.

शहर विकास विभाग :-

शहर विकास विभागाबाबत खुप मोठा प्रश्न चिन्ह आहे. शहर विकास विभागाने आजपर्यंत प्रचंड थकबाकी ठेवलेली आहे. आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती जर का तुम्हाला एका दिवसांत सुधारायची असेल तर शहर विकास विभागाकडे जेवढया थकबा की आहेत त्या सर्व काढा. मी तुम्हाला सांगते की, पुढच्या वेळेचा जो निधी आहे तो तुम्हाला शहर विकास विभागाकडून मिळेल हे मी आश्वासन देते. कारण मी फक्त दोन-चार फाईल्स इकडे तिकडे बघितल्या आहेत. त्या फाईल्समध्ये साठ-सत्तर लाख रुपये दंड आकारला आहे मात्र अजून तो वसूल केलेला नाही असे का? जर आपण हा पैसे काढून ठाणेकर जनतेच्या उपयोगात आणला तर जास्त चांगले होईल.

मा. महापौर महोदय, आपल्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात डायलेसिस विभाग आता सुरु केला आहे अतिशय चांगली गोष्ट आहे. मी वारंवार सांगितले आहे की, आपल्या हया रुग्णालयात कॅन्सर ट्रिटमेंट होणे अतिशय गरजेचे आहे. मा.महापौर महोदय, आपल्या प्रत्येकाच्या प्रभागात थोडया फार प्रमाणांत स्लम एरिया आहे. कॅन्सर हा रोग श्रीमंत माणूस किंवा गरीब माणूस बघून होत नाही. तो आमच्यासारख्या गृहिणींना सुध्दा होतो. परंतू हया रोगाचा उपचार करणे अतिशय कठीण आणि खर्चीक आहे. काही वेळेला असे वाटते श्रीमंतांनी कॅन्सर रोगावर उपचार करुन बरे व्हावे आणि गरीबाला फक्त मरणच आहे. अशी परिस्थिती आपल्या महापालिकेत येऊ नये. मा.महापौर महोदय, कॅन्सर पेशंटसाठी जी केमो थेरीपी लागते म्हणजे आता हाय टेक्नॉलॉजी आली आहे त्या टेक्नॉलॉजीची अपेक्षा नाही. पण जी केमो थेरीपी आहे ती केमो थेरीपी जर आपण आपल्या कळवा रुग्णालयात देऊ शकलो तर ते खुप चांगले होईल. कारण त्याच्या एका सेटींगला ५० ते ९० हजार रुपये इतका खर्च आहे आणि संपूर्ण कॅन्सर बरा होण्यासाठी सात ते आठ लाख रुपये खर्च आहे. म्हणजे एखादा ऑफिसला जाणारा माणूस असेल तरी तो आपल्या

आयुष्याची संपूर्ण पुंजी देतो मात्र त्याच्यातून रिझल्ट काहीच निघत नाही. मा. महापौर महोदय, मी असे म्हणत नाही ही सेवा आपण विनामुल्य दयावी. हया सोयीमधून महापालिकेला सुध्दा उत्पन्न मिळू शकेल. म्हणजे जिथे ५० ते ९० हजारांची ट्रिटमेंट आहे ती आपण आपल्या हॉस्पीटलमध्ये एक पॅकेज ठेवू एक ते दिड लाखमध्ये केमो थेरेपीची संपूर्ण ट्रिटमेंट करुन कॅन्सर रोग्यांना बरे करु शकतो. म्हणजे टाटा मेमोरीयल पेक्षा आपली रक्कम कमी असली पाहिजे एवढाच आपला हेतू आहे. आपल्या ठाण्यातील लोक केमो थेरीपी घेण्यासाठी एकतर ज्युपिटर, बेथनी किंवा टाटा मेमोरीयल खारघरला जातात. रुग्णांना एवढया लांब जायला लागू नये म्हणून आपल्या ठाण्यातच ही सुविधा उपलब्ध करुन दयावी आणि ती कमी दरात उपलब्ध करुन दयावी. ती योजना सगळयांसाठी सुध्दा देऊ नका आपण ही योजना देण्यासाठी एक उत्पन्न ठरवू या आणि त्या उत्पन्नात बसत असतील तरच त्यांना हया ट्रिटमेंटची मुभा देऊ. मा. महापौर महोदय, अशाप्रकारची ट्रिटमेंट सुरु केली तर फार बरे होईल. कारण जो स्वत: कॅन्सर पेशंट असतो त्यालाच माहिती असते काय अवस्था असते. एखादा गरीब माणूस असेल तर त्याची घरकाम करणारी बाई असेल ती आपल्या मालकाकडून मदत घेते आमच्या सारख्या नगरसेवकांकडे येते आम्ही तिला एखादया संस्थेकडून मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करत असतो आणि काही केली तरी त्यांच्या संपूर्ण आजारासाठीची रक्कम आम्ही त्यांना गोळा करुन देऊ शकत नाही. मा.महापौर महोदय, माझ्या माहितीप्रमाणे आमचे तिसरे बजेट आहे आतापर्यंतच्या सगळया बजेटच्या वेळी मी हा मुद्दा मांडलेला आहे. निदान महिलांचा विचार करुन हा मुद्दा अंमलात आणला तर फार बरे होईल. तसेच सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, आपल्याकडे कुत्र्यांचे निर्बीजीकरणाचे जे काम होते ते गेल्या वर्षभरात कुठल्याच प्रभागात झाले नसेल. मला वाटत नाही इथे कोणी सांगू शकेल की, आमच्याकडील कुत्रे उचलले गेलेत आणि त्यांच्यावर त्याप्रकारची ट्रिटमेंट झाली आहे. त्यामुळे हया वर्षभरात कुत्र्यांची संख्या खुप वाढलेली आहे. सगळीकडे महिलांच्या सुरक्षिततेची खुप मुद्दे आहेत. परंतू आता सध्या कुत्र्यांपासून लहान मुलांना आणि महिलांना कोण वाचवणार तेच कळत नाही. मा. महापौर महोदय, खरच सगळीकडे कुत्र्यांची संख्या खुपच वाढलेली आहे त्यामुळे ही ही सध्याची वस्तूस्थिती आहे. हया सगळया गोष्टी कधी होणार आहेत तेच कळत नाही. मी या ठिकाणी छोटे उदाहरण देते माझी सोसायटी ४० बिल्डींगची आहे. तिथे गेटपासून मोजायला लागलो तर चारचाकी गाडयांखाली असलेले कुत्रे सोडून कमितकमी २५-३० कुत्रे असतात.

मा.महापौर महोदय, तीनहात नाका येथील भुयारी मार्गासाठी आपण बजेटमध्ये २५ लाखाची तरतूद केली आहे त्याबद्दल मी आपली आभारी आहे. परंतू आपण ज्यावेळी काम सुरु करु तेंव्हा ते काम २५ लाखामध्ये होणार नाही. त्यामुळे ही तरतूद वाढवून दयावी आणि ती वाढवत असताना असाही विचार करावा की, आता आपल्या ठाण्यात मेट्रो रेल्वे येणार आहे आणि तिनहात नाका हे स्टेशन असणार आहे. आणि त्याची अडचण हया भुयारी मार्गाला येऊ नये असे प्लॅनिंग करावे जेणेकरुन आपल्या महापालिकेचा पैसा व्यर्थ जाऊ नये.

मा.महापौर महोदय, आम्हाला जे बजेटचे पुस्तक दिलेले आहे त्यामध्ये सन २०१४ च्या भांडवली खर्चा अंतर्गत विभागनिहाय स्पिलओव्हर. आपले जे बजेट बनवतात त्या निपुर्ते मॅडमना विनंती करेन की, पुढच्या वेळी असा सुध्दा एक कॉलम दया की, आपले जे हेड आहेत त्यातून आपण किती उत्पन्न कमवतो हे सुध्दा आले पाहिजे. जेणेकरुन त्या ठिकाणाहून आपल्याला जास्त उत्पन्न मिळते त्या ठिकाणी आपण जास्तीत जास्त खर्चही देऊ शकतो. कारण ब-याच ठिकाणी असे आहे की, तिकडे शुन्य उत्पन्न आहे आणि आपण खर्च करत चाललोय. त्यामुळे हया गोष्टी आपण महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता करणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, हया वर्षी आपण पर्यावरण विभागामार्फत खुप छान असा पर्यावरण दिन साजरा केला. पण मला असे वाटते की, पर्यावरण दिन हा एक दिवसाचा नसतो. ज्यावेळी आम्ही पर्यावरण दिनानिमित्त गेलो होतो त्यावेळी तिथे मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब होते. सौर उर्जा, वर्षा संचयन प्रकल्प या योजना चांगल्या आहेत आणि त्या प्रत्यक्ष अंमलात आणणे खुप गरजेचे आहे. त्यावेळी मी मा.आयुक्त साहेबांना विनंती केली होती की, ज्या सोसायटीमधील लोकांना त्यांचा प्रॉपर्टी टॅक्स कमी करायचा आहे त्यांच्या मार्गदर्शनासाठी तुम्ही महापालिकेत एक डेक्स तयार करा. जेणेकरुन त्या लोकांना टॅक्समध्ये सूट देता येईल आणि त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी महापालिका पाऊल उचलत

आहे. कारण सगळयाच गोष्टी आर्थिकदृष्टया बघून चालत नाही. आपल्यावर समाजाचे काही ऋण असते ते आपल्याला परत करायचे असते. आपण जो पर्यावरण दिनानिमित्त जो कार्यक्रम आयोजित केला होतो तो जर आपण वर्षभर चालू ठेवला म्हणजे एखादा डेक्स् उपलब्ध करुन दिल्यास ज्या काही संस्था आहेत त्या तिथे बसून आपल्या नागरिकांना गाईड करतील की, कशाप्रकारे वर्षा संचयन प्रकल्प किंवा सौर उर्जा प्रकल्प राबविला पाहिजे. ज्यामुळे त्या सोसायटीला प्रॉपर्टी टक्समध्ये फायदा होईल आणि आपल्याला फायदा होईल की, गार्डन किंवा बोरींगसाठी ते पाणी वापरता येईल आणि महापालिकेचे पाणी चांगल्या कामासाठी वापरात येईल.

मा.महापौर महोदय, मी ज्या प्रभागाचे प्रतिनिधित्व करते त्या माझ्या प्रभागात ठामपा ची शाळा क्र. १८ आहे. या शाळेबाबत मला असे सांगायचे आहे की, हया शाळेला माहे ऑगस्टमध्ये १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. म्हणजे महापालिकेला जरी १०० वर्ष पूर्ण होणार नसली तरी ही शाळा ग्रामपंचायत काळापासूनची असल्यामुळे हया शाळेला १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, हया शाळेची खुपच दुरावस्था झालेली असल्यामुळे तुम्ही हया शाळेसाठी थोडाफार निधी दयावा जेणेकरुन हया शाळेला १०० वर्षपूर्ण झाल्यामुळे तिची दुरुस्ती करुन आपण एक चांगले पाऊल उचलल्यासारखे होईल.

यानंतर जेष्ठ नागरिक धोरण :-

मा.महापौर महोदय, हया आपल्या अर्थसंकल्पात जेष्ठ नागरिकांसाठी फक्त एका विरंगुळा केंद्र सुरु करण्यासाठी एक छोटा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मला असे वाटते की, जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधून देणे एवढेच गरजेचे नाही तर मला असे वाटते की, ठाण्यामधील काही जेष्ठ नागरिक घ्या. म्हणजे आपण ज्याप्रमाणे आपल्या ठामपा हद्दीत महिला बालकल्याण योजना राबवितो त्याप्रमाणे हया जेष्ठ नागरिकांसाठी योजना राबवा. म्हणजे प्रत्येक प्रभागातून दहा जेष्ठ नागरिक घ्या जे खरंच सिंगल आहेत त्यांची मुल त्यांना सांभाळत नाहीत. अशा जेष्ठ नागरिकांना आपण दत्तक घेण्याची एक योजना राबवा. मा.महापौर महोदय, मला असे वाटते की, हयासाठी आपण एखादया दत्तक घेणा-या संस्थेस हाताशी धरावे कारण ब-याच संस्था हे काम करतात. त्यामुळे अशी एखादी संस्था आपल्याला मदत करु शकेल. जेष्ठ नागरिकांसाठी काहीतरी करणे खरच गरजेचे आहे. मा. महापौर महोदय, कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये जेष्ठ नागरिकांना त्यांच्या परिवहनमध्ये सुट दिली जाते. परंतू आपल्या ठाणे महापालिकेत अजून ही योजना चालू करण्यांत आलेले नाही तरी आपल्या परिवहनसेवेमध्ये जेष्ठ नागरिकांना सूट दिली जावी.

मा. महापौर महोददय, हया बजेटनंतर ठाणे महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारावी अशी अपेक्षा करते. जेणेकरुन आमच्यासारख्या लहान नगरसेविकांना विकास कामांसाठी थोडा फार निधी मिळेल. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते. जयहिंद, जय महाराष्ट्र!

**श्रीम. महेश्वरी तरे :-**

मा.महापौर महोदय, मा. उप महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब, मा.स्थायी समिती, सभापती, मा.सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षाचे मा. गटनेते तसेच सर्व नगरसेवक, नगरसेविका, पत्रकार बंधू सभागृहात काल पासून उपस्थित नाहीत. पण त्यांना आपण मान देतो. मा.पत्रकार बंधू आणि सर्व अधिकारी वर्ग.

मा.महापौर महोदय, कालच्या सभेमध्ये ठाणे महापालिकेचा सन २०१३-१४ चा सुधारित आणि सन सन २०१४-१५ चा रुपये २३५५ कोटीचा मुळ अर्थसंकल्प सादर झाला आहे. कालपासून अनेक नगरसेवकांची या ठिकाणी चर्चेत भाग घेतलेला आहे. सन्मा.नगरसेवक डुंबरे साहेब बोलले की, बजेटची सभा आहे आणि सभागृहात उपस्थिती फार कमी आहे आणि मी त्यांच्या हया मताशी सहमत आहे. माझ्या माहितीप्रमाणे गेल्या वर्षी सभागृहातील नविन सदस्यांनी सुध्दा बजेटवर बोलण्याचा प्रयत्न केला होता. भले त्या दोन वाक्य चार वाक्य बोलल्या असतील पण जवळ जवळ सगळयाच महिला बजेटवरील चर्चेत भाग घेतला होता आणि शेरो-शायरी आणि कवितांचा तर महापूर लोटला होता. गेल्या एक वर्षात काय झाले माहित नाही. आपल्या महापालिकेचा आर्थिक कणा घसरल्यामुळे की काही कळत नाही. पण हया वर्षी शेरो-शायरी सगळे विसरले आहेत. कालपासून एकानेही कविता केली नाही. मला कविता करता येत नाही

म्हणून मी सुध्दा कविता केलेली नाही. कदाचित मा.सभागृहनेते आणि मा.विरोधी पक्षनेते करतील. मागच्या वर्षी एवढा सुखद अनुभव आला होता मग हयावेळेला अशी अनास्था का? असे का झाले त्याचे प्रत्येकाने आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. काल सन्मा.सदस्य श्री. मणेरा साहेब, देखिल त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात बोलले की, फुगवलेला अर्थसंकल्प आहे. जरी आपल्या उत्पन्नाचे स्त्रोत आटलेला असला तरी भरीव असा अर्थसंकल्प आहे. मी असे म्हणेन की, सूज आलेला अर्थसंकल्प आहे. कारण काय होते की, त्याआकडेवारी अर्थसंकल्पात मांडलेल्या असतात. त्या साक्षत उतरतात की नाही. किंवा त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की नाही हे कोणीच बघत नाही. गेल्या वर्षी चर्चे भागत घेतलेल्या भगिनीच्या बोलल्यातून असे जाणवले की, आम्ही चर्चेत भाग घेतला. चुकीचे बोललो असेल पण आम्ही बोलण्याची धारिष्ठ केले. परंतू आमच्या सूचनांचा अंर्तभाव झाला का? गेले सात वर्ष मी बजेटवर सभागृहात बोलत आहे. पण मला सुध्दा असा अनुभव आलेला नाही. परंतू राहवत नाही. ठरवते की बोलायचे नाही बोलून काही फायदा नाही. पण कधीतरी असे होते की, निदकाचे घर असावे शेजारी. म्हणजे आपण जर बोललो नाही तर आपल्याच त्रृटी, आमची सत्ता आहे आणि मी शिवसेनेची नगरसेविका आहे आणि मी बोलेले तर आपल्याच त्रृटी आपण कोणीतरी दाखविणे गरजचे आहे. कारण दुस-यांनी आपल्यावर बोट दाखविण्यापेक्षा आपणच त्याच्यावर बोट ठेवले तर मला वाटते कधीही शहाणपणाचे ठरेल. आणि म्हणूनच मी वेळेला मी बजेटवर बोलते हया चर्चेत भाग घेते. या ठिकाणी झालेल्या चर्चेतून मला असे जाणवले की, बजेटच्या चर्चेत भाग घेतला नाही तरी चालेल कारण आम्ही फाईल घेऊन ज्यावेळी बजेट मागायला जातो त्यावेळी आम्हाला विचारणा होते की, तुमच्या वरिष्ठांच्या यादीत तुमच्या कामाचे नांव आहे का? मला माफ करा. परंतू ही वस्तुस्थिती आहे आणि सत्यस्थिती नाकारता येत नाही. त्यामुळे आम्ही इथे बडबड करण्यापेक्षा आमच्या कामाची फाईल पदाधिका-यांच्या लिस्टमध्ये कशी जाईल त्याकडे आम्ही लक्ष घालू. त्यामुळे इथे बोलण्यांत अर्थ नाही असे सुध्दा काहींच्या बोलण्यातून दिसून आले. मा.महापौर महोदय, असे होता कामा नये. आम्ही देखिल आमच्या प्रभागात प्रतिनिधीत्व करत असतो. त्यामुळे बजेटचा फायदा हा सगळयांना मिळाला पाहिजे. पदाधिका-यांच्या लिस्टमध्ये ज्यांना कामांची नांवे आहेत त्यांची कामेच होतात असे होता कामा नये. मला जाणवले आहे नगरसेविका बोलायला घाबरतात. पण जे सत्य आहे ते कोणीतरी बोललेच पाहिजे त्याशिवाय सत्य काय आहे आणि असत्य काय आहे ते कळत नाही. त्यामुळे आज या ठिकाणी मी बोलत आहे.

मा.महापौर महोदय, मी सगळयाच विषयावर या ठिकाणी बोलणार नाही. कारण ब-याच सदस्यांनी त्यांच्या भाषणात महत्वाच्या अशा सूचना मांडलेल्या आहेत. मी या ठिकाणी मा.सभागृहनेत्यांचे अभिनंदन करेन की, हयावेळी त्यांनी जेष्ठ नागरिक आणि नागरिकांच्या सूचना देखिल मागविल्या होत्या आणि त्या सूचनांचा अंतर्भाव बजेटमध्ये होणार होता असे मी पेपरमध्ये वाचले होते. त्या सूचना त्यांना मिळाल्या की नाही ते माहित नाही. कदाचित त्यांच्या भाषणात ते उल्लेख करतील. त्यामुळे नागरिकांच्या सूचनांबरोबर आमच्या देखिल सूचनांचा अंतभार्व करावा अशी मी सूचना करते.

मा.आयुक्त साहेबांनी हे बजेट मांडले आहे. जमा-खर्चावर मी बोलणार आहेच. परंतू मा.आयुक्तांनी त्यांच्या निवेदनात दिले आहे की, अर्थसंकल्प तयार करणे म्हणजे फक्त जमा-खर्चाचे विवरण तयार करणे नसून महापालिकेची संपूर्ण आकडेवारी ही विश्लेषणाबरोबरचे समाजातील सर्व घटकांचा अभ्यास करुनच त्याचे ध्येय धोरण निश्चित केले पाहिजे. खरचं मा.आयुक्त साहेबांचा चांगला मानस आहे. आणि त्याची अंमलबजावणी करताना सर्वसामान्य नागरिकांना सुलभ आणि सहजरित्या त्या त्या सुविधा मिळाल्या पाहिजेत किंवा आपली जी कर भरणा करण्याची सुविधा आहे ती पध्दती सुधारण्याची सुध्दा संधी दिली पाहिजे. तसेच सामान्य नागरिकांना नजरेसमोर ठेवून त्यांना कर भरण्यासाठी किंवा प्रशासकिय कामांमध्ये येणा-या अडचणी आपल्या ज्या कार्यपध्दती आहेत त्या चांगल्या पण कधी-कधी एवढया किचकट असतात की, जेष्ठ नागरिक किंवा एखादा सामान्य नागरिक असतील त्यांना त्या मागण्या पु-या करता-करता कंटाळतत किंवा त्यांना आपल्या कार्यालयात मिळणारी जी वर्तणूक असते ती पाहता त्या सामान्य नागरिकांना एक मानाचे स्थान असले पाहिजे किंवा त्यांचे काही बोलणे असेल वा त्यांचे काही सांगणे असेल तर ते आपल्याकडे ऐकून घेतले पाहिजे. किंवा प्रशासकिय कार्यपध्दतीतील दोष किंवा उणिवा दूर करुन कर भरण्याच्या पध्दतीत दुखिल सुलभता आणली पाहिजे. सामान्य नागरिकांबाबत मा.आयुक्त

साहेबांना जी आत्मीयता आहे त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करते. कारण ते एक टिम लिडर आहेत पण फक्त टिम लिडरला असे वाटून उपयोग नाही. त्याचे जे सहकारी बंधू आहेत त्यांच्याकडून त्यांनी ते काम करुन घेतले पाहिजे. कारण अगदी हाताच्या बोटावर मोजण्या इतके अधिकारी-कर्मचारी वर्ग आहे की, तो चांगल्या पध्दतीने काम करतो. परंतू अर्धे जे सुस्तावलेले अजगर आहेत त्यांना अजिबात काम करण्याची अजिबात इच्छा नाही. ही मा.आयुक्त साहेबांची जबाबदारी आहे. आज मा.आयुक्त साहेब, हया ठिकाणी असायला पाहिजे होते. जेणेकरुन आमच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहचतील. या ठिकाणी मी अशी मी अपेक्षा करते की, आमच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहचव्यात.

मा.महापौर महोदय, आपल्या महापालिकेची आताची जी परिस्थिती आहे ती बघितली तर मी असे सांगेन, कदाचित अधिकारी वर्गाला राग येईल. पण जर त्यांचे विवरणपत्र दर वर्षी सादर करायला सांगितले तर नक्की त्यांची संपत्ती दिवसेंदिवस वाढत जाते आणि महापालिकेची संपत्ती जिथे आहे तिथेच आहे. मा.महापौर महोदय, जे आहे ते फॅक्ट आहे आणि ते आपण स्वतः अनुभवले पाहिजे. व त्याबद्दल आपण काहीतरी ॲक्शन घेतली पाहिजे. त्यांना हया महापालिकेमध्ये मी काम करतो त्याबद्दल आत्मियता वाटून त्यांनी या ठिकाणी काम केले पाहिजे. कालच सन्मा.सदस्य, श्री. घाडीगांवकर साहेबांनी सांगितले की, जो एलबीटी वसूल केला त्यांचे काम खरंच वाखाण्याजोगे आहे. म्हणजे एखाद-दुस-याचे नांव घेऊन चालणार नाही. मा.आयुक्त साहेबांनी टिम लिडर बनून सगळयांना कामाला लावले पाहिजे असे मला वाटते. तसेच ठाणेकर नागरिकांना मालमत्ता कराचा आणि स्थानिक कराचा भरणा करण्यासाठी आपण ऑनलाईन सुविधा देतोय जेणेकरुन नागरिकांना अशाप्रकारचे कर भरण्यास सुविधा मिळावी आणि आपला कराचा भरणा वाढावा. आपल्याकडे नागरि सुविधा केंद्रात देखिल माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन कामकाजात गतिमानता आणण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. परंतू आपल्याला जे इच्छित मांडायचे असे बघितले तर मुंबई महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेनंतर ठाणे महानगरपालिका श्रीमंत महापालिका म्हणून नावारुपाला होती. आणि आता जर बघितले तर आपल्या महापालिकेचा स्वाभिमानाचा कणाचा मोडून गेलेला आहे. आपल्या तिजोरीत एवढा कडकडात झालेला आहे. मा.महापौर महोदय, आजचा पुढारी पेपर कोणी वाचला असेल तर त्या पेपरनी सरळ हेडलाईन दिली आहे की, खिशात नाही आणा आणि मला म्हणे बाजिवराव म्हणा. ते जे टिका करतात हया सभागृहात आपण १३० सदस्य आहोत. त्यामुळे एक जबाबदार व्यक्ती म्हणून आपण पण त्याच्यात असतो. म्हणून हे जे टिका करतात त्यात फक्त महापौर किंवा प्रशासन जबाबदार नसून आपण सदस्य देखिल हयात सामिल असतो हे लक्षात घ्या.

मा.महापौर महोदय, अंदाजपत्रात तरतूद केलेल्या निधी पेक्षा अधिक निधींची कामे केल्यामुळेच गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रात हया वर्षी ताळमेळ राखण्यासाठी अधिका-यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. मला वाटते हयावेळेच्या विभागावार स्पिलओव्हर यादीत हे सगळे उघड झालेले आहे. मागील वर्षी असलेले ५७२ कोटीचा स्पिलओव्हर यंदा दुप्पट म्हणजे ११६१ कोटी इतका झालेला आहे. मागिल वर्षीची देणी देतानाच प्रशासनाच्या तोंडाला फेस येणार आहे. म्हणजेच आपण अर्थसंकल्पावर नुसतं बोलून चालणार नाही तर हयाच्या मागचा अभ्यास देखिल आपण केला पाहिजे. आता मी या ठिकाणी आकडेवारी वाचून दाखविते.

सार्व. बांधकाम विभाग- २७८,८२,७५,०००/- , विद्युत विभाग ६,१०,५९,०००/-,उदयानविभाग :- ५,०८,४८,०००/-, घनकचरा :- १ कोटी ८० लाख , आरोग्य विभाग :- १४ कोटी ५०लाख, यंत्रशाळा :- १० लाख, प्रदुषण यंत्रणा :- ४३ लाख ९९ हजार. पाणी पुरवठा- १०, ८४,०७,०००/-, मलनिःसारण विभाग- १५ कोटी ५० हजार हया सगळयाची टोटल केली तर ३२८,६९,७७,०००/-इतका स्पिलओव्हर आहे. म्हणजेच आपल्या जमेपेक्षा हा खर्च जास्त आहे. त्यामुळे हयाचा आपण अभ्यास करणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, हया जादा निधीच्या खर्चामुळेच अंदाजपत्रकांत मार्केट बांधणे, विद्युत पोल, साफ-सफाई, वाहन खरेदी आणि रुग्णवाहिका खरेदी हया सारख्या हेडसाठी आपल्याला अर्थसंकल्पात तरतूद ठेवता आलेली नाही. हया स्पिलओव्हरमुळे यावर्षी फक्त नविन कामांसाठी खर्च करणेसाठी एकूण २४ विभागासाठी ३९० कोटी ७७ लाख २६ हजार रुपये शिल्लक आहेत. त्यामुळे आपण हयाचा देखिल अभ्यास केला पाहिजे. कारण बरेच नगरसेवक अर्थसंकल्पावर बोलताना माझ्या प्रभागात हे पाहिजे त्यासाठी तरतूद करावी अशी मागणी करत असतात. पण हयावेळी आपल्याला ते ही सांगता येणार नाही कारण

आता मी तुमच्यासमोर जी आकडेवारी मांडली त्यानुसार आपल्याकडे ३९० कोटी ७७ लाख २६ हजार इतकी रक्कम आहे. आणि गोषवा-यामध्ये जाहिर केलेला भांडवली खर्च निधी ५३ कोटी,६६ लाख, १ हजार इतका दाखविला आहे. म्हणजे ही आकडेवारी चुकीची दिलेली आहे. अहवालामध्ये एकूण स्पिलओव्हरची रक्कम ११६१ कोटी, ३ लाख, २४ हजार इतकी तर देय रक्कम फक्त ७७२ कोटी, २८ लाख, ९६ हजार इतकी आहे. त्यामुळे आता सगळयांनी सांगितले की, कशाप्रकारे आपला मालमत्ता कर वाढेल वगैरे त्याच्यावर मी देखिल बोलणार आहे. परंतू ज्या सूचना सन्मा. सदस्यांनी केल्या आहेत त्या त्यांनी वेळ जात नाही आणि सभागृहात काहीतरी बोलायचे आहे म्हणून सूचना केल्या आहेत असे नाही तर पोट तिडकीने ते बोललेले आहेत. कारण त्यांना त्यांच्या प्रभागात जेवढे नागरिक आहेत त्यांना तोंड दयायचे असते.. त्यामुळे प्रभागातील नागरिकांना असे वाटते की, आम्ही ज्यांना निवडून दिले आहे त्यांच्याकडून ही मो झालीच पाहिजेत. त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नगरसेवक इथे बोलतात. त्यामुळे कृपया त्यांच्या सूचनांचा हयामध्ये अंर्तभाव करण्यात यावा अशी विनंती आहे.

मा.महापौर महोदय, आपल्या उत्पन्नाचे जे मुख्य स्त्रोत होत ते जकात होते. आणि १ एप्रिल २०१३ पासून आपण जकात ऐवजी ठाणे महापालिकेत आपण एल.बी.टी म्हणजेच स्थानिक संस्था कर लागू केलेला आहे. या करामध्ये असे होते की, आयातीकांनी आयात केलेल्या मालाचे स्वयंमुल्य निर्धारित करुन त्याची रक्कम चलनाद्वारे बँकेमध्ये भरणा करावी. परंतू चालू महिन्याचा जो स्थानिक कर असतो तो पुढील महिन्याच्या २० तारखेच्या आंत त्यांनी भरला पाहिजे. हया पध्दतीमुळे फक्त ११ महिन्याचे उत्पन्न आपल्याकडे प्राप्त झालेला आहे. आणि त्यानुसार हया बजेटमध्ये रुपये ६५० अपेक्षित उत्पन्न धरण्यांत आलेले आहे. मकी तर असे म्हणेन की, आपल्या गेल्या वर्षी हा जो एल.बी.टी.कर चालू केला त्यावेळी शहर किंवा राज्य पातळीवर विविध व्यापारी संघटनांनी विरोध केल्यामुळे आपल्याला सुरवातीच्या पाच महिन्यात हया महसूलात मोठया प्रमाणावर घट झाली आणि त्यानंतर जनजागृती केल्यावर व्यापा-यांनी त्याच्यात नांव नोंदणी करण्यास सुरुवात केली. अजूनही ब-याचशा व्यापा-यांनी नांव नोंदणी केलेली नाही. तरी त्यांच्यावर दंडात्मक अशी ठोस कार्यवाही महापालिकेमार्फत झाली पाहिजे असे मला वाटते.

मा.महापौर महोदय, आता मा.मुख्यामंत्र्यानी एल.बी.टी. तुम्ही चालू ठेवायची की नाही याबाबत स्थानिक संस्थाना म्हणजेच महापौरांना आदेश दिलेले आहेत. एल.बी.टी. अजून चालू राहणार आहे की, नाही त्याबाबत आपल्याला अजून नीट माहिती नाही. कारण हयाबाबत निर्णय घेण्याबाबत मा. महापौरांना आदेश दिलेले आहेत. आणि त्याबाबत मी पेपरमध्ये वाचले की, सर्वपक्षिय नगरसेवकांसमवेत मिटींग घेऊनच तो निर्णय घेण्यात येणार आहे. मा.महापौर महोदय, हा निर्णय लवकरांत लवकर लावावा. मा.महापौर महोदय, व्यापा-यांचा एल.बी.टी. ला जसा विरोध आहे तसाच तो जकातीला सुध्दा आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, व्हॅटवर जो कर लागला जातो त्याचाच अधिकार वाढविण्यात यावा. पेपरमध्ये असेही आले होते की, राज्य शासनाने मुद्रांक शुल्काचे ४५ कोटी रुपये अजून दिलेले नाहीत. ते अजूनही दिलेत की नाही ते माहित नाही माझ्या माहितीप्रमाणे मा.महापौरांनी त्याबाबत मागणी केली होती. त्याचप्रमाणे याबाबत सर्व्हीस टॅक्सचा पर्याय सुध्दा समोर आलेला आहे. त्यामुळे यापैकी कोणताही कर लावाल त्यासाठी आपल्या महापालिकेने व्यापा-यांना विश्वासात घेतले पाहिजे आणि लवकरांत लवकर हा निर्णय घेऊन जो कर चालू कराल तो व्यापा-यांनाहा सुटसूटीत होईल आणि आपले देखिल उत्पन्न वाढेल अशाप्रकारचा निर्णय लवकरांत-लवकर घेऊन आपल्या महानगरपालिकेची उत्पन्न वाढविले पाहिजे. कारण जेवढा वेळ होईल त्यात मग एल.बी.टी नको असे झाले तर गेल्या वर्षी जसे आपले पाच महिने वाया गेलेत. त्यामुळे या गदारोळात पुन्हा आपल्यावर तशी परिस्थिती यायला नको. तसेच वॅटवर परत अधिभर लावला तर मला अशी एक शंका येते की, वॅटवर जो अधिभार असेल किंवा कराचा जो पैसा असेल तो राज्य शासनाकडे जाईल आणि मग महापालिकेत एकाची सत्ता, राज्य शासनात एकाची सत्ता असे असताना त्यावेळी त्यांना तो पैसा इकडे वर्ग करण्यास जर त्यांना विलंब झाला की, विकासाचे श्रेय यांना मिळायला नको तर त्यामुळे सुध्दा अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे वॅट नको पण जो काही निर्णय तुम्ही घ्याल तो असा घ्य की, गोंधळात टाकणारा नसावा आणि त्याचा थेट भरणा आपल्या महापालिकेत व्हावा. जेणेकरुन आपल्याला जास्तीत जास्त विकास काम करता येतील आणि ज्याप्रमाणे ठाणे महानगरपालिका आतापर्यंत हया पैशातून विकास कामे करत होती तशाप्रकारची विकास कामे झाली पाहिजेत असे मला वाटते.

आहोत आपण जर नागरिकांना आदर्श घालून दिला तर आपले नागरिक त्याचे अनुकरण नक्कीच करतील असे मला वाटते.

मा.महापौर महोदय, महिला बालकल्याण योजनेसाठी मला वाटते हया वर्षीच्या बजेटमध्ये २० कोटीची तरतूद करण्यांत आली आहे. सध्या आपल्याकडे अजून विशेष समितीची स्थापना झालेली नाही. यापूर्वी आम्हाला जेंडर बजेटमध्ये माहिती मिळत होती की, कुठल्या योजना असतील, कुठल्या योजनेवर किती खर्च आहे हे आम्हाला समजत होते. परंतू यावर्षी आम्हाला अशाप्रकारची माहिती देण्यात आलेली नाही. फक्त त्याच्यात असे नमूद केलेले आहे की, योजनेसाठी २० कोटीची तरतूद आहे. आता सध्या विषेश समिती गठीत नसल्यामुळे महासभेत किंवा हया बजेटच्या मिटींगमध्ये आम्ही या विषयावर बोलू शकतो की, चांगल्या पध्दतीच्या ज्या योजना आहेत त्या जास्तीत जास्त राबवा. पथनाटय वगैरे अनेक अशा योजना आहे की, त्या आपल्याकडे राबविल्या जात नाहीत. मी गेले पाच वर्ष महिला बालकल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून होते. पण माझ्या प्रभागात कधीही आरोग्य विषयक योजनांसाठी वगैरे पथनाटय आयोजित केलेले नाही. त्यासाठी फक्त बजेट टाकतात पण आतापर्यंत मला एक कळले नाही की, जर त्याच्यावर बजेट टाकले आणि ते बजेट वापरलेच गेले नाहीतर तो निधी जातो कुठे? हयाबाबतची माहिती आम्हाला मिळणे आवश्यक आहे कारण आमच्या नागरिकांनी जर हयाबाबत विचारणा केली तर आम्हाला त्यांना उत्तर देता आले पाहिजे. आता जर बजेट टाकले आणि त्याच्यावर अंमलबजावणी झाली नाही तर पुढच्यावर्षी तुम्ही त्या बजेटचे काय केले किंवा ते बजेट तुम्ळी दुसरीकडे कुठे वापरले याची माहिती आम्हाला माहिती देणे बंधनकारक केले पाहिजे.

मा. महापौर महोदय, आपल्याकडे स्वतःचे असे शाही धरण किंवा सन्मा. सदस्या, नम्रता भोसले हयांनी सांगितल्याप्रमाणे स्वतःचे डंपिंग ग्राऊंड नाही. आपण आपल्याकडे जे मोठ मोठे प्रकल्प राबवितो किंवा आपण पार्क वगैरे करतो त्यापेक्षा आपण अशा गोष्टींना प्राधान्य दिले तर निश्चितपणे आपण ठाणेकरांच्या ज्या मुलभूत गरजा आहेत त्या भागवू शकतो. आमच्या इथे सुशिक्षित लोक आहेत. समजा जर एखादे झाड पडले तर ते लगेच आम्हाला फोन करतात आम्ही नियमित करदाते आहोत आमच्या माफक अपेक्षा आहेत. म्हणजे त्यांना त्यांच्या मुलभूत गरजा भागविल्या पाहिजेत ते त्याच्यावर लक्ष केंद्रीत करतात. त्यामुळे मोठ मोठे प्रकल्प राबविण्यापेक्षा शाही धरणासाठी पाठपुरावा केला पाहिजे असे मला वाटते. जेणेकरुन जे पाणी आपण दुसरीकडून विकत घेतोय ते आपल्याला घ्यावे लागणार नाही.

मा.महापौर महोदय, हया बजेटमध्ये थीम पार्क, हुतात्मा पार्क, सायन्स पार्क हयासाठी तुम्ही निधी ठेवला आहे. परंतू ठाणे लोकमतमध्ये ४२ गार्डनची जी दुरावस्था झाली असल्याचे दाखवले होते त्या गार्डनच्या सुशोभिरणासाठी निधी ठेवला आहे का? त्याबाबत कुठेच उल्लेख केलेला नाही. आपल्याकडील लहान मुल कशी एखादे नविन खळणे आले की, त्याच्याच बरोबर खेळतात आणि जुनं खेळणं विसरुन जाते. तसं आपल्या महापालिकेचे चालेले आहे. एकदा बांधून झाल की, नंतर विसरुन जायचे तस होता कामा नये. ज्या काही वास्तू किंवा उदयानं आपण बांधतो त्यांची सुव्यवस्था राहिली पाहिजे. तेथील सुरक्षा रक्षक म्हणा किंवा इतर सोयी सुविधावर आपण लक्ष ठेवले तर त्याच त्या गोष्टींसाठी आपल्याला वारंवार खर्च करावा लागणार नाही आणि त्यामुळे आपली बचतही होऊ शकेल हा एक महत्वाचा मुद्दा आहे.

मा. महापौर महोदय, वागळेइस्टेट येथे नाटयगृह बांधण्यासाठी निधी ठेवला आहे. ज्याप्रमाणे आपण डॉ.काशिनाथ नाटयगृह बिल्डरला टी.डी.आर. देऊन आपण बांधून घेतले होते. त्याच पध्दतीने जर आपण हे बांधून घेतले तर त्यासाठी जी ५० लाखाची तरतूद आपण ठेवली आहे. माझी अशी सूचना आहे की, ते नाटयगृह जर त्याच्याप्रमाणे बांधून घेतले तर हा पैसे आपल्याला दुसरीकडे कुठेतरी वापरता येईल तरी याबाबत नोंद घ्यावी अशी विनंती आहे. आपल्याकडे डॉ. काशिनाथ घाणेकर नाटयगृह, गडकरी रंगायतन, दादोजी कोंडदेव स्टेडीयम हे सगळे पांढरे हत्ती आपण पोसतोय. त्यातून आपल्याला काहीच उत्पन्न मिळत नाही. तिथे आमदानी अठ्ठनी खर्च्या रुपैय्या अशी अवस्था आहे. परंतू आपल्याला आपला आर्थिक व्यवस्थेचा डोलारा सुधारायचा असेल तर हयाबाबत आपल्याला लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, कळवा हॉस्पीटल उपकरणे व डायलेसिस केंद्रासाठी ४.५ कोटीची तरतूद ठेवण्यात आलेली आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे, गोर-गरीबांना सुविधा मिळावी. अलिकडे पेपरमध्ये आले होते मा.महापौर साहेबांनी व मा.आयुक्त साहेबांनी दौरा केला होता. मा.महापौर महोदय, आपण मोठ-

मोठया सुविधा देत असताना त्याचबरोबर अत्यावश्यक असलेली अँटी रेबीज लस त्यांच्याकडे उपलब्ध नाही. म्हणजेच हया आवश्यक अशा महत्वाच्या सुविधा देत असताना प्राथमिक सुविधा डावलून चालणार नाही. मोठ मोठया सुविधा देत असताना प्राथमिक सुविधा देखिल वेळेवर पुरविल्या पाहिजेत. मा.महापौर महोदय, मागच्या सभेत मुंब्र्यातील मुलाला कुत्रा चावला त्याच्या संपूर्ण प्राथमिक उपचाराचा खर्च आपण केला. हया कुत्र्यांसाठी कोंडवाडा तयार करुन त्या कुत्र्यांना हया कोंडवाडयात ठेवावेत. कारण ठाणे महापालिकेमार्फत प्रभागातील सर्वच नागरिकांना आपण उपचार देऊ शकत नाही. परंतू कोंडवाडा विभागासाठी जर जास्त निधी दिला आणि अशा कुत्र्यांची देखभाल करण्यास सांगितले तर अतिशय चांगले होईल असे मला वाटते.

मा.महापौर महोदय, ठाणे महापालिकेचे राजीव गांधी महाविदयालय आपण चालवतो. महिला म्हणून मला या विषयावर बोलावेसे वाटते. मा.महापौर महोदय, हया ठिकाणी विदयार्थीनीचे लैंगिक शोषण झाले. मा.महापौर महोदय, अशापध्दतीने ठाणे महापालिकेचे नांव खराब न होण्यासाठी आपल्या अशा महाविदयालयामध्ये सी.सी.टीव्ही. कॅमेरे लावण्यांत यावेत. महापौर महोदय, हया बाबी जरी खर्चिक वाटल्यातरी महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे अतिशय महत्वाचे आहे असे मला वाटते. हॉस्पीटल्स, महाविदयालय किंवा इतर आपल्या महापालिकेच्या वास्तू असतील तिथे महिलांच्या सुरक्षितेतेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, आपण हया बजेटमध्ये उपवन फेस्टीवलसाठी चार कोटी रुपये ठेवले आहेत. मा.महापौर महोदय, हे खाजगी संस्थेचे असूनही त्याला आपण एवढे अनुदान कशासाठी देतोय? मा. महापौर महोदय, चार कोटी रुपये खुपच झाले. सन्मा.सदस्या. सौ. विचारे वहिनीनी सूचना केली त्यापेक्षा आपल्या महापालिकेने चालवावे आणि ते उत्पन्न आपण घ्यावे. मा. महापौर महोदय, हयात एक मुद्दा मी ॲड करेन की, डॉ. विजय बेडेकर यांनी आपल्या प्राचीन साहित्याचा अनमोल ठेवा त्यांनी आतापर्यंत जतन करुन ठेवलेला आहे आणि तो नौपाडा प्रभाग समितीमध्ये होता तो गेल्याच वर्षी हाजूरी येथे शिफ्ट केला. अतिशय जुना दस्ताऐवज त्यांच्याकडे आहे. मा.महापौर महोदय, डॉ.विजय बेडेकर अतिशय पोटतिडकीने आपल्याकडे मागणी करत आहेत. तरी आपल्या साहित्यप्रेमी ठाणेकरांसाठी थोडासा निधी राखून ठेवावा जेणेकरुन आपण ठाणेकर लोकप्रतिनिधी नागरिक म्हणून आपल्या प्राचीन ग्रंथांचे संवर्धन करणे गरजेचे आहे. मा. महापौर महोदय, शिक्षण मंडळाबाबत मी काही बोलणार नाही. कारण इथे नमूद केले आहे ३५ हजार विदयार्थी हयाबाबत मला इतकाच मुद्दा मांडायचा आहे की, आपण वारंवार मी शिक्षणमंडळाच्या निधींमध्ये वाढ करतोय जेवढा निधी मागणी होते तेवढा निधी आपण देतोय. आता त्यांनी लिहीले आहे ३५ हजार विदयार्थी आणि गेल्या वेळच्या अर्थसंकल्पात लिहीले होते ३९ हजार विदयार्थी म्हणजेच ४ हजार विदयार्थ्यांनी गळती झालेली असतानाही इकडे निधी वाढतोच आहे. त्यामुळे निधी देताना विचार करावा अशी सूचना आहे.

मा. महापौर महोदय, दरवर्षी आपल्या बजेटमध्ये नव-नविन योजनांची बरीच लिस्ट असते आणि दरवर्षी आपल्याला एक स्वप्नाचे गाजर दाखविले जाते. मोनेरेल झाली, मेट्रोरेल झाली, एल.आर.टी. झाली. गेल्या वर्षी आयुक्त राजीव साहेब होते त्यांना मी म्हटले की, हे मुंगेरीलाल के हसीन सपने कशासाठी? त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, झोपत स्वप्न कधी बघत नाही जागेपणी बघतो. पण जागेपणी स्वप्न बघितले तरी खरी होणारी स्वप्न बघावीत. आता इथे मी कोणाच्याही विरोधात जाऊन बोलणार नाही. परंतू मेट्रो रेल्व अशी आपल्या ठाणेकर नागरिकांची अपेक्षा आहे आणि त्यासाठी राजकारण किंवा जे काही असेल ते बाजूला ठेवून आपल्या ठाणेकर नागरिकांसाठी आपण झटले पाहिजे. आपले सन्मा. श्री सुधाभाई साहेब सभापती झाले त्यावेळी जसे आपण सगळे एकत्र आलो तशाप्रकारे आपण सगळे एकत्र येऊन अशाप्रकारे प्रकल्प राबविले पाहिजेत म्हणजे कोणी त्याच्यात खोडा घालणार नाही. मी काही विश्लेषक नाही माझ्यापेक्षा कितीतरी जास्त जाणकार हया सभागृहात बसलेले आहेत. एक महिला म्हणून मी सांगते की, लोकांच्या मनातील हा प्रश्न आहे. त्यामुळे कुठल्याही पक्षाने यात राजकारण आणू नये. आपण लोकांना जी स्वप्न दाखवतो ती पूर्ण झाली पाहिजेत. आपण खाडीकिना-याचा विकास बघितला, मत्सालय बांधण्यासाठी दरवर्षी तरतूद ठेवतो. पण ज्युपिटरच्या बाजूला मत्सालय काही दिसत नाही. परंतू तरतूद मात्र असते. ती तरतूद तुम्ही कुठे वळवता ते मला माहिती नाही. त्यानंतर ओझरता कटाक्ष टाकला तर, हेलियम बलून बद्दल पण असते ते पण कुठे दिसत नाही. त्यामुळे आपल्या महापालिकेत फक्त कागदी घोडे

नाचविले जातात असा प्रकार चालला आहे. तसे व्हायला नको जे प्रकल्प पुर्णत्वास जाणार असतील त्याच प्रकल्पांचा तुम्ही पाठपुरावा करुन ते प्रकल्प पुर्णत्वास न्या असे मी म्हणेन.

मा. महापौर महोदय, आजच्या ठाणे वैभव मधील संपादकिय लेख कोणी वाचला असेल तर संपादकाने त्यात असे म्हटले आहे की, खरचं नगरसेवकांना नितिमत्तेबाबत चाड असेल तर त्यांनी आरक्षित भूखंडाचा लेखा-जोखा घ्यावा आणि त्यातून जे सत्य दिसेल ते कटू असेल असे त्यांनी त्यांचे मत मांडले आहे. पण हयाबाबत मी असे म्हणेन की, आम्ही जर अशी माहिती मागितली तर समोरच्यांनी आम्हाला ती दिली पाहिजे. अशाप्रकारचा लेखा-जोखा ठराविक जणानांच मिळतो. आमच्यासारख्यांना मिळत नाही हे दखिल मी सभागृहात सांगते आणि मला वाटते बहुतांशी नगरसेवक माझ्या मताशी सहमत असतील. अशाप्रकारचा लेखा-जोखा आम्हाला दिला तर त्याच्यामधून आम्ही चांगले काही करु शकलो तर आम्हाला अभिमान असेल की, आम्ही सभागृहात हसताना काहीतरी चांगले काम केले आणि आमच्या सहका-यांनी त काम झाले असे मला वाटते. आताच सनमा.सदस्य नम्रता भोसले हिने सांगितले की, जेष्ठ नागरिकांसाठी फक्त विरंगुळा केंद्र देऊन फायदा नाही. त्याचप्रमाणे गेली पाच वर्ष मी सांगतेय की, वृध्दाश्रम राबवावे. मला माहिती आहे आपला आर्थिक कणा ढासळलेला आहे परंतू आपली जी जिद्दा शाळा आहे ती आज २७ वर्षे झाली तरी विविध संस्थानी केलेल्या मदतीमुळेच आजही चांगल्याप्रकारे कार्यरत आहे आणि मुख्य म्हणजे मुख्याध्यापिका श्यामश्री भोसले होत्या त्यांनी अतिशय योग्यरितीने खुप चांगल्यापध्दतीने जिद्दशाळा चालवली होती. मा.महापौर महोदय, जर आपण जिद्दशाळा चालवू शकतो तर आपण जर वृत्तपत्रामध्ये एखादे आवाहन केले तर अशा अनेक संस्था आहेत त्या पुढे येतील. मा.महापौर महोदय, आम्ही या ठिकाणी आमच्या सूचना मांडतो पण खरोखर अशी गरज देखिल आहे कारण एखादा वृध्द असतो त्याला कोणीच नसते त्यावेळी त्याच्या आजूबाजूचे सांगतात जर तुमची वृध्दाश्रमामध्ये ओळख असेल तर हयांना तिथे नेऊन सोडा. पण लांब जाण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या मालकीचे वृध्दाश्रम असेल तर असा प्रश्नच उद्‌भवणार नाही. मा.महापौर महोदय, आपली ठाणे महानगरपालिका कितीतरी कामांसाठी पुरस्कार घेणारी पहिला महानगरपालिका असते त्यावेळी आम्हाला सगळयांना फार अभिमान वाटतो की, आमची महापालिका पुरस्कार मिळालेली पहिली महानगरपालिका आहे. त्यामुळे अशाप्रकारचे वृध्दाश्रम झाले आणि त्यासाठीचा पुरस्कार ठाणे महापालिकेला मिळाला तर त्याचा सुध्दा आम्हाला खुप आनंद वाटेल.

मा.महापौर महोदय, परिवहन समिती ही महत्वाची समिती आहे. परिवहनसाठी २० कोटीच्या वाढीव तरतूदीसोबत ४५ कोटीच्या रुपये आपण परिवहनच्या उध्दारासाठी आपण दिलेले आहेत. महापौर महोदय, रामाच्या पदस्पर्शाने आहिल्येचा उध्दार एकदाच झाला परंतू हया परिवहन समितीचा उध्दार केंव्हा होणार आहे ते देवच जाणे. दर वेळेला मेलेल्या अवस्थेत असलेल्या परिवहनला आपण प्रत्येक वेळी निधी देत असतो. निधी देण्याबरोबर त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे मला वाटते. अनेक कारणे असतील कोणाचे राजकिय नेत्यांशी संबंध असतील, राजकिय आश्रय असलेले कर्मचारी वर्ग असतील, एखादा भ्रष्ट अधिकारी असेल किंवा त्यांचा नियोजन शुन्य कारभार असेल तर हयाबाबत आपल्याला लक्ष देणे गरजेचे आहे. कारण आमच्या मितीला ठाण्याची लोकसंख्या २० लाखाच्या घरात पोहचली आहे. आणि एक लाख लोकसंख्येला ४० बस असे पकडले तर आपल्याला जवळ जवळ ८०० बसेसची गरज आहे. आजच्या मितीला आपल्याकडे ३२५ बस असून फक्त २०० बसे रस्त्यावर धावत आहेत. हया बसेस अपु-या पडत असल्यामुळे प्रवाशांना प्रायव्हेट वाहनांचा आधार घ्यावा लागतो. मा.महापौर महोदय, आपण परिवहन सेवेला निधी देताना आपले हे देखिल कर्तव्य आहे की, आपण देत असलेल्या निधीचा चांगल्यापैकी विनियोग झाला पाहिजे. आपण त्यांना प्रत्येक वर्षी निधी देतो मात्र परिस्थिती जैसे थे असते असे व्हायला नको यासाठी एखादया सक्षम अधिकारी जो चांगल्याप्रकारे हया परिवहनचा कारभार हाताळू शकेल आणि तिला सक्षम करु शकेल त्याची या ठिकाणी तात्काळ नियुक्ती करण्यात यावी

मा.महापौर महोदय, ज्या महत्वाच्या सूचना आहेत त्याच मी मांडलेल्या आहेत. इतरांनी केलेल्या सूचनांवर बोलायचे ते बरोबर वाटत नाही. म्हणून हया ज्या काही सूचना मी केलेल्या आहेत त्याच्या विचार करावा अशी विनंती करते आणि सौ.अर्चना निपुर्ते एक महिला असून कारण आम्ही जर बजेटचे पुस्तक उघडले तर एकक, दशक मोजता मोजता आमची भंबेरी उडते. आणि त्यांनी अतिशय सुंदर असा अर्थसंकल्प तयार करताना त्यांना काय अडचणी येत असतील त्या त्यांच्या त्यानाच माहित. हया पूर्ण

कर्मचारी वर्गाचे मी या ठिकाणी अभिनंदन करते. आणि जे काही पडखर विचार मी या ठिकाणी मांडले त्याबाबत कदाचित कोणी दुखावले असेल तर आणि मी फार हार्श बोलते तर पण जे सत्य असते ते नेहमी कटू असतं आणि ते कोणीतरी बोललेच पाहिजे. म्हणून आज मी माझे विचार मांडले आहेत. परंतू मी बोलल्यामुळे ज्यांना कोणाला वाईट वाटले असेल तर त्यांनी मला माफ करावे. एवढे बोलते आणि माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र!

**श्रीम. प्रमिला केणी :-**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्त साहेब, आणि सन्मा.सभागृह. या ठिकाणी अर्थसंकल्प सादर झाला आहे आणि त्यावर मला बोलायला मिळाले त्याबद्दल मी आपली आभारी आहे.

मा.महापौर महोदय, पाणी पुरवठा आकार - अर्थसंकल्प टिप्पणीमध्ये मुबलक पाणी उपलब्ध असल्याचे म्हटले आहे. परंतू अपु-या वितरण व्यवस्थेमुळे कळवा प्रभागावर नेहमीच अन्याय होत असल्याचे चित्र दिसत असते. कळव्याच्या सक्षमीकरणाकरीता भांडवली व महसूली अशा दोन्ही प्रकारच्या निधीमध्ये भरवी तरतूद करणे आवश्यक आहे. मात्र रायलादेवी, वर्तकनगर या प्रभागाच्या तुलनेमध्ये आमच्या कळवा प्रभागाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. मा.महापौर महोदय, कळवा प्रभाग समितीला वाढीव आर्थिक तरतूदीची गरज आहे. त्याचप्रमाणे अस्थापनेवरील खर्च वाढू नये म्हणून कर्मचारी भरती करता येत नाही असे म्हटले आहे. तथापि अपु-या कर्मचारी वर्गामुळे पाणी वितरण व्यवस्थेला अडचणी येत आहेत. वितरण व्यवस्था स्टेम कंपनीला वर्ग करण्याचा प्रस्ताव काय आहे याची माहिती सर्व सदस्यांना मिळणे गरजेचे आहे.

मा.महापौर महोदय, कळवा प्रभाग समितीकडील करदात्या नागरिकांकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत आहे. गेल्या ३२ वर्षात कळवा प्रभागाकडे एक फायर स्टेशन बांधण्यात आलेले नाही. आग लागल्यास आम्हाला जवाहरबाग आणि मुंब्रा अग्निशमन दलावर अवलंबून रहावे लागते. याबाबत मा.आयुक्त महोदयांनी तांतडीने लक्ष देणे गरजेचे आहे. तात्पुरत्या स्वरुपात कळवा स्विमिंग पुल येथे एखादा फायर इंजिनची व्यवस्था करण्यात यावी अशी कळव्यातील सर्व सदस्यांच्यावतीने विनंती करीत आहे.

जाहिरात कर :-

मा.महापौर महोदय, ठाणे महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र १२८ चौरस किलोमिटर आहे आणि त्यामध्ये ३५० चौरस किलोमीटरपेक्षा अधिक लांबीचे रस्ते आहेत. असे असताना असंख्य व्यावसायिक होर्डिंग्ज फलक हया रस्त्यांवर लावण्यांत येतात. आणि हया फलकांचे उत्पन्न सात कोटीच्या आसपास आहे. मा.महापौर महोदय, जाहिरातीसाठी चांगल्या धोरणाची गरज आहे आणि त्यातून महापालिकेस अधिक उत्पन्न मिळू शकेल तरी प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सुधारीत अर्थसंकल्प कमी होण्याची कारणे :-

जेएनएनयूआरएम अंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून ठाणे महापालिकेस भरघोस अनुदान मिळत असताना अंतर्गत प्रशासन कार्यवाही उदासिन असल्याचे दिसून येते. महत्वाचे प्रकल्प या माध्यमातून राबविणे शक्य असून महानगरपालिकेने इतर उत्पन्नात भर देऊन मुलभूत विकास कामे करणे गरजेचे आहे.

विविध प्रकारच्या सेवामधून अपेक्षित उत्पन्न व त्यावरील खर्च :-

नाटयगृह व क्रिडा पेक्षागृह यामधून मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च याचे प्रमाण खुप कमी आहे. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयास येणारा खर्च, राजीव गांधी वैद्यकिय महाविदयालयास येणारा खर्च यातून मिळणा-या सेवा व एकूण उत्पन्न यात होणारा तोटा याकडे मा.आयुक्त साहेबांनी लक्ष देणे गरजेचे वाटते.

विशेष प्रकल्प :-

मा.महापौर महोदय, कळवा खाडी पूल, कळवा स्टेशन परिसर सुधारणा प्रकल्प, कळवा स्टेशन पूर्व परिसर सुधारणा प्रकल्प, कळवा पूर्व येथे पार्किंग प्रकल्प, खारेगांव रेल्वे क्रॉसिंगवरील आर.ओ.बी. , कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील मच्छी मार्केटचा विकास करणे, स्मशान भूमीचे विस्तारिकरणे, गणेश विर्सजन घाटावरील सुधारणा, इनडोअर स्पोटस् कॉम्प्लेक्स.

विकास शुल्क :-

शैक्षणिक भूखंड भाडे करारावर न दिल्यामुळे रुपये ३० कोटीचे उत्पन्न का बुडाले? सध्या टी.डी.आर. मिळणासाठी लागणारा सरासरी कालावधी बघता, प्रशासनाने सुचविलेल्या प्रिमीयमनुसार उत्पन्न प्राप्तीचे आकडे कमी वाटतात. अधिक उत्पन्न प्राप्त होण्याकरीता प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

महिला बालकल्याण कार्यक्रम :-

मा.महापौर महोदय, सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे महिला व बालकल्याण कार्यक्रम पंचवार्षिक योजना काय आहे? याबाबतची सविस्तर माहिती आवश्यक आहे.

तसेच महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सन्मा.अध्यक्ष श्री. शरद पवार साहेब यांच्या प्रयत्नांने महापालिकेत आम्हाला ५० टक्के आरक्षण मिळालेले आहे. त्यामुळे या कार्यक्रमा अंतर्गत महिला सुरक्षा, मुलगी वाचवा यासारखे उपक्रम समाविष्ट असावेत अशी मी आपणांस विनंती करीत आहे.

मागासवर्गीय निधी :-

मागासवर्गीय कल्याण, मागासवर्गीय निधी अंतर्गत सन २००१ च्या जनगणनेनुसार हया निधीची वाटप करण्यांत येते. त्याऐवजी सन २०११ च्या जनगणनेनुसार ही निधी वाटप होणे गरजेचे आहे.

क्रिडा धोरण :-

मा. महापौर महोदय, प्रशासनाने बाल व युवा वर्गाकरीता खासकरुन कळवा प्रभागासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली नसल्याचे दिसून येते. यावर मा.महापौर व मा.आयुक्त साहेबांनी भाष्य करावे.

परिवहन सेवा :-

कळवा स्टेशन येथून आईनगर विटावा येथे मिनीबस सेवा उपलब्ध करुन देणे शक्य आहे का? असल्यास प्रशासनाने तसा अभ्यास केला आहे का? अशा बससेवा नसल्यामुळे महिला व विदयार्थी हयांची खुप गैरसोय होत असते.

मा.महापौर महोदय, मी केलेल्या सूचनांचा विचार करणेत यावा अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र!

**श्री. शैलेश पाटील :-**

मा.महापौर महोदय, मा.उप महापौर महोदय, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेते.

मा. महापौर महोदय, अर्थसंकल्पावर बोलण्या इतपत माझा अभ्यास अथवा अनुभव नाही. परंतू अर्थसंकल्पाचे भलेमोठे पुस्तक चाळत असताना काही गोष्टी लक्षात आल्या आहेत त्या मांडाव्याशा वाटतात. मा. महापौर महोदय, अर्थसंकल्पात दिवा प्रभाग समितीसाठी फक्त १० लाखाची तरतूद करण्यांत आली आहे. १८ किलोमीटरचा प्रभाग, ३५० ते ४०० लोकसंख्या हयापुढे हे प्रमाण अतिशय विषय आहे. अर्थसंकल्पामध्ये जे काही मांडण्यात आले आहे किंबहूना ज्या काही तरतूदी केल्या आहेत त्यांचे निकष काय आहेत, आधार काय आहेत? माझ्याकडे वॉर्ड निहाय लोकसंख्या उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे बहुतांश वॉर्डांची लोकसंख्या २० ते २५ हजार अशी आहे आणि प्रभाग क्रमांक ६५ ची लोकसंख्या १,२७,१२०

इतकी आहे आणि अर्थसंकल्पामध्ये १० लाखाची तरतूद ही तफावत कशासाठी? ठाण्यामध्ये असे काही प्रभाग आहेत तिथे सर्वप्रकारच्या सुविधा आहेत. उदा. मुबलक पाणी, चांगल्याप्रकारचे रस्ते,दवाखाने, चांगल्याप्रकारची दिवाबत्तीची सोय आहे आता त्यांना हवे आहे ते थीम पार्क आणि सुमधूर संगीताची सोय असलेले बगीचे, वातानुकूलीत वाचनालय . मा.महापौर महोदय, दिवा प्रभागातून दर वर्षी महापालिकेला ८ ते १० कोटी इतका महसूल मिळतो आणि असे असताना आमच्या अपेक्षा मात्र माफक आहेत. व्यवस्थित चालता येतील असे रस्ते, मासिक दोन हंडे पाणी, एखादे प्रसुतीगृह, गटाराचे पाणी रस्त्यावर येऊ नये यासाठी गटारे, दिवाबत्तीची सोय, चांगली शिक्षण सोय. हया अपेक्षा जर पूर्ण करता येत नसतील तर माझी हया सभागृहाला अशी विनंती आहे की, एकतर १० लाखाची तरतूद किमान १० कोटीची करावी अन्यथा आमची चेष्टा थांबवा आणि आम्ही आम्हाला पालिकेतून कायमचे वगळा. एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र!

**श्री. बालाजी काकडे :-**

मा. महापौर महोदय, मा.उप महापौर, मा.सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य, पत्रकार बंधू भगिनीनो .. .. ..

या सभागृहामध्ये सभापती-स्थायी समिती सन्मा.श्री.सुधाकर चव्हाण यांनी सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प सादर केला. त्या अनुषंगाने मी बोलू इच्छित आहे.

खरं म्हणजे संपूर्ण महापालिका क्षेत्रातील कामांचा आढावा घेऊन अत्यंत अभ्यासपूर्वक अशी चर्चा करुन स्थायी समिती सदस्यांनी व प्रशासनाने हा परिपूर्ण असा अर्थसंकल्प तयार केला आहे. त्याबद्दल सर्वप्रथम मी सर्वांचे आभार व्यक्त करतो.

हया अर्थसंकल्पामध्ये साहजिकच दोन बाजू आहेत. यामध्ये जमा व खर्च या दोघांचा समतोल साधत हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे. निश्चितच या माध्यमातून नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत आणि नागरिकांच्या मागणीनुसार कामे करणे ही नगरसेवकांची जबाबदारी असते. या अनुषंगाने मी काही सूचना करुन इच्छितो.

सर्वप्रथम मी जमेच्या बाजूने माझे विचार मांडणार आहे. महापालिकेच्या उत्पन्नाबाबत बोलायचे झाल्यास सध्या ठाणे शहराची झपाट्याने होणारी वाढ पाहता, मालमत्ता करापासून व पाणीपट्टीद्वारे मोठया प्रमाणात उत्पन्न मिळू शकते. त्याकरीता प्रशासनाने प्रयत्न करावेत.थकबाकीदारांवर नियमानुसार कारवाई करुन जास्तीत जास्त वसुली कशी होईल या दृष्टीने पहावे.

ठाणे शहरात अनेक प्रकारचे जाहिरात फलक लावले जातात. जाहिराती पासूनही म.न.पा.ला चांगल्या उत्पन्न मिळू शकेल. त्याकरिता सक्षम कर्मचारी वर्ग या विभागाकडे उपलब्ध करणे आवश्यक आहे.

ठाणे शहरात अनेक ठिकाणी टोलनाके आहेत. या टोल नाक्यांवर वाढीव बांधकाम झाले आहे. नाशिक मार्गावर खारेगांव टोल नाका आहे. टोलनाक्यावर गेल्या ३२ वर्षापासून आयारबेस कंपनी टोल वसूल करते. हया टोलनाक्यावर वाढीव बांधकाम झाले आहे. तिथे दोन चाळी हॉटेल्स बांधण्यात आली आहेत. त्याबाबत मी शहर विकास विभागाकडून माहिती मागवली आहे. त्याची संपूर्ण फाईल माझ्याकडे आहे. वाढीव झालेल्या बांधकामस टॅक्स आकारणी करण्याबाबत वारंवार अधिका-यांना सांगून देखिल टॅक्सची आकारणी अद्याप झालेली नाही. गेल्या ३२ वर्षापासून त्या टोलनाक्याने आपल्या महापालिकेची फसवणूक केलेली आहे. तिथून करोडो रुपयांचे उत्पन्न मिळणार होते परंतू अधिका-यांनी त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. याबाबत मी गेले दोन वर्ष सतत पाठपुरावा करत आहे. पहिले पत्र मी दिनांक ४.०९.२०१२ रोजी पत्र दिले होते. पत्र दिल्यापासून दोन वर्ष झाली हया दोन वषार्त आपल्याला किती टॅक्स मिळाला असता? त्या कंपनीने तिथे आर.सी.सी. स्ट्रक्चर उभे केले आहे. लोखंडी खांब, पत्र्याची शेड, फॅब्रीक स्टेंनलेस, कंटेनर कॅबीन , वीटा-सिमेंटची चाळ, आर.सी.सी. फुटींग काढून मोठया लोखंडी खांबावर बारमाही शेड उभी केली आहे. एवढे मोठी त्या ठिकाणी वाढीव बांधकाम झालेले आहे. आतापर्यंत तिथे किती टॅक्स वसूल झाला असता? परंतू त्या ठिकाणी अजिबात कोणीही लक्ष दिलेले नाही. याबाबत मला या ठिकाणी सभागृहाला अशी विनंती करायची आहे की, सदर ठिकाणी ज्या अधिका-यांची दुर्लक्ष करुन

कामचुकारपणा केला आहे अशा अधिका-यांविरुध्द कामचुकार केल्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (ब) नुसार कारवाई करावी अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे ठाण्यात अनेक ठिकाणी टोलनाके आहेत ते टोलनाके सुध्दा तपासून त्यांचा सर्व्हे करुन त्यांनी केलेल्या वाढीव बांधकामावर कर आकारणी करावी. जेणेकरुन महापालिकेचे उत्पन्न वाढेल. तसेच जुने बांधकाम व नवीन बांधकाम झालेल्या ठिकाणी अनेक लोक वास्तव्य करीत आहेत. परंतू त्यांना टॅक्स लागलेला नाही. जर या ठिकाणी टॅक्स लावला तर ठामपाचे उत्पन्न नक्कीच वाढेल. त्याचप्रमपणे ठामपा हद्दीत येणारे कच्चे मटेरियल उदा.सिमेंट, स्टील, लादी, गेरु, स्टाईलिंग, प्लॅस्टिक खेळणी यावर प्रशासनाने लक्ष दिले तर निश्चितच लाखो रुपयांचा महसूल आपल्याला मिळू शकतो. तसेच ठाणे शहरात मोठा मोठे रस्ते केले आहेत. त्या ठिकाणी फेरीवाले, गॅरेजवाले अनधिकृतपणे व्यवसाय करतात. या मंडळीकडून १० ते २० रुपये घेतले जातत. परंतू काही लोकांकडून पैसे घेतले जात नाही. तर काही ठिकाणी पैसे घेतले जातात परंतू त्यांना त्याची पावती दिली जात नाही. यामधून देखील आपला महसूल बुडत आहे आणि हे वास्तूव्य आहे या छोटया-छोटया बाबी असल्यातरी प्रशासनाने याकडेही गांर्भियाने लक्ष दयावे असे माझे मत आहे.

आपले जसे काही विभाग आहेतख ज्यासाठी आपल्याला खर्च करावा लागतो. यामधून उत्पन्न मिळत नाही. परंतू या विभागाची कामे ही अत्यावश्यक सेवा आहेत. उदा दयायचे झाले तर शहरातील घनकचना व्यवस्थापन यावर आपल्याला खर्चच करावा लागतो. परंतू आज अशी परिस्थिती आहे की, ठिक ठिकाणी कच-याचे ढीग दिसत आहेत. कच-याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावण्यासाठी प्रशासनाने ठोस पाऊले उचलावीत.

महापालिकेची अंग असलेली परिवहन सेवा आज कोलमडलेली आहे. ठाण्यामध्ये प्रवासी संख्या फार मोठी आहे. परंतू आपल्या परिवहन सेवेचे योग्य नियोजन नसल्यामुळे किंबहूना आवश्यक बसेस उपलब्ध नसल्याने परिवहन सेवेवर ठाणेकर नागरिक नाराज आहेत. परिवहन सेवा सक्षम व्हावी यासाठी आपण दरवर्षी अनुदान स्वरुपात निधी देत असतो. परंतू परिवहन सेवा सक्षम का होत नाही ही चिंतेची बाब आहे. आपण योग्य नियोजन केल्यास निश्चितच परिवहन सेवा सक्षम होईल व नागरिकांना चांगली बस सेवा आपण उपलब्ध करुन देऊ शकतो. मा.महापौर महोदय, मुंब्रा विभागाची पाहणी केल्यास आपल्याला दिसून येईल की, कुठेही बस थांबे नाहीत, जिथे आहेत त्यांची दुरावस्था झालेली आहे अशी आजची स्थिती आहे. याचा प्रशासनाने गांर्भियाने विचार करावा अशी माझी सुचना आहे. परिवहनच्या संबंधित अधिका-यांना याबाबत कळविले तर ते वेळेवर लक्ष दत नाहीत, कामे करण्याची त्यांची इच्छा नाही असे एकूणच दिसून येते असा आमचा अनुभव आहे.

मा. महापौर महोदय, हया अर्थसंकल्पावर बोलत असताना मी माझ्या प्रभागातील कामांबाबतही बोलणार आहे. माझा प्रभाग हा दाटीवाटी व झोपडपट्टींचा आहे. या ठिकाणी नागरिकांची आवश्यक कामे झाली नाहीत ते स्थानिक नगरसवकांना जबाबदार धरण्यांत येते.

मा.महापौर महोदय, आपण प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत रुपये ४० लाखांची तरतूद ठेवली आहे. काही प्रभाग हे मी मघाशी म्हटल्याप्रमाणे झोपडपट्टीने व्याप्त आहेत, येथे कामांची मागणी मोठी असते. तरी ही तरतूद रुपये ५० लाख इतकी करण्यांत यावी.

माझा प्रभाग हा झोपडपटी असून, हा प्रभाग एका बाजूस खाडी तर दुसरा भाग डोंगराने व्यापलेला आहे. हा प्रभाग मुंब्रा रेल्वे स्टेशन ते आतकोनेश्वर नगर, कळवा असा पसरलेला आहे. या प्रभागातील लोकसंख्या व तयासाठी उपलब्ध असलेल्या सार्व. शौचालयाचा विचार केला तर ती अत्यंत अपुरी आहेत. या प्रभागात अजून नवीन पाच सार्व. शौचालये बांधणे गरजेचे असून यासाठी अंदाज १.२० कोटींची तरतूद आवश्यक आहे. ती या अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध करुन मिळावी ही विनंती.

मा.महापौर महोदय, माझ्या प्रभागातील वस्ती ही गरीब वस्ती असून, येथील मुले ही महापालिकोच्या शाळेत शिक्षण घेतात. आज शाळा क्र.४९ व ९३ मधील पटसंख्या हजारोंच्या घरात आहेत. परंतू सदरची शाळा इमारत ही ग्रामपंचायत काळातील आहे. अत्यंत धोकादायक अशी ही वास्तू आहे. नागरिकांना दुसरा पर्याय नसल्याने ते आपली मुल मोठया विश्वासाने येथे पाठवत आहेत. भविष्यात अपघात झाला तर आपण विचार सुध्दा करु शकत नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. या शाळा इमारतीची पुर्नबांधणी करणे गरजेचे आहे. यासाठी या अर्थसंकल्पामध्ये रुपये एक कोटीची तरतूद करण्यांत

यावी. अनेक भागात आपण अशाप्रकारे शाळांची पुर्नबांधणी केली आहे तसा न्याय येथील नागरिकांना दयावा अशी मासी विनंती आहे.

मा. महापौर महोदय, अर्थसंकल्पातील तरतूदींचा अभ्यास केला तर नाले बांधणे किंवा दुरुस्तीसाठी अत्यंत कमी तरतूद केली असल्याचे दिसून येते. माझ्या प्रभागात मोठ मोठे नाले असून ते खाडीला जोडलेले आहेत. त्यांचे मजबूतीकरण करणे किंवा नव्याने बांधणे आवश्यक आहे. यासाठी जी तरतूद ठेवलेली आहे त्यामध्ये वाढ करुन २.२५ कोटी इतकी तरतूद करण्यांत यावी.

तरी मी या ठिकाणी जास्त न बोलता लेखाशिर्षकानिहाय केलेल्या तरतूदीमध्ये वाढ करणेबाबत सूचना करीत आहे. मा.महापौर महोदय, आता मी वाढ करण्यासाठी थोडया प्रमाणात आकडे जास्त सांगणार आहे परंतू काही प्रमाणांत जरी आकडेवारी ठेवली तर टोकन बजेट दाखवून कामाला सुरुवात करता येईल यासाठी मी या ठिकाणी विनंती करणार आहे.

गटारे बांधणे रुपये ८० लाख, पायवाटा बांधणे रुपये २ कोटी, समाजमंदिर बांधणे रुपये १.२५ कोटी, स्मशानभूमी बांधणे रुपये ५० लक्ष, रेल्वे भुयारी मार्ग बांधणे रुपये २ कोटी, मुंबई-पुणे महामार्गावर पादचारी पूल बांधणे रुपये १ कोटी, व्यायामशाळा बांधणे रुपये ५० लक्ष, रेतीबंर वस्तीमधून रेल्वेला समांतर रस्ता तयार करणे रुपये १ कोटी, पदपथ दिवे व मिनी हायमास्ट रुपये ३० लक्ष, जलवाहिनी दुरुस्ती रुपये ४० लक्ष अशी तरतूद करण्यांत यावी.

मा.महापौर महोदय, मी केलेल्या सूचनांचा विचार या अर्थसंकल्पामध्ये करावा अशी मी विंनती करतो. व आपण मला बोलण्याची संधी दिली त्या बद्दल आपले मन:पूर्वक आभार व्यक्त करुन आपली रजा घेतो. धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र!

**श्रीम. अनिता गौरी :-**

मा. महापौर महोदय, प्रस्तावित सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदीसाठी बैठक आयोजित केल्याबद्दल मी मा.महापौर, मा.उप महापौर,मा.आयुक्त साहेब, मा.सभागृहनेते, मा.विरोधी पक्षनेते, तसेच सन्मा.नगरसेवक, सन्मा.नगरसेविका व सभागृहात उपस्थित बंधू-भगिनिनो.

प्रथम या ठिकाणी मी मा.आयुक्त साहेबांना एक विनंती करते. आयुक्त साहेब, ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात ठिक-ठिकाणी काम थांबलेली आहेत. कारण ठेकेदारांना त्यांची बिले अदा झालेली नाही. तरी याबाबत काहीतरी ठोस उपाय करुन त्यांना बिले अदा करणेंत यावीत. जेणेकरुन आमच्या प्रभागातील कामे सुरळीत चालतील. टेंडर निघालेली आहेत कामं पास झालेली आहेत. परंतू बिल मिळाली नाहीत म्हणून कामं थांबलेली आहेत.

मा.स्थायी समिती सभापती यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे. तरी या आम्ही या अर्थसंकल्पाच्या दृष्टीने केलेल्या सूचनांचा समावेश करण्यांत यावा अशी मी या ठिकाणी विनंती करते. त्याचप्रमाणे खारेगांव रेल्वे क्रॉसिंगवर आर.ओ.बी प्रस्ताव या अर्थसंकल्पात घेतल्याबद्दल मी मा.आयुक्त साहेबांचे आभार मानते. त्याचप्रमाणे आम्ही स्काय वॉकचा प्रस्ताव दिला होता तो ही हयाच्यात समाविष्ठ करावा अशी मी विनंती करते. कारण मागच्या वेळेला स्कायवॉक चुकीच्या जागी दाखविला होता म्हणून रद्द झाला आहे. आता आम्ही नविन जागा सुचवली आहे. हया जागेबाबत मा. आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, हया जागेत कुठेही अडथळा नाही. आता आम्ही जी जागा दाखवली आहे ती, खारेगांव नाक्यावरुन डायरेक्ट कळवा स्टेशनपर्यंत जाणारा रस्ता आहे. तरी स्कायवॉकचा देखिल समावेश याच्यात करण्यात यावा ही विनंती मी करते.

पार्किंग प्लाझा :-

झपाटयाने विकसीत होणारा खारेगांव परिसर हया ठिकाणी कुठल्याही प्रकारे पार्किंगची सोय नसल्यामुळे रस्त्यावर कोठेही गाडया पार्क होतात. दोन कोटीची जी तरतूद केलेली आहे. मा.महापौर महोदय, खारेगांवमध्ये अनेक भूखंड आहेत की, जिथे पार्किंग प्लाझा उभारता येतील. त्या भूखंडावर पार्किंग प्लाझा करण्यांत यावे. जेणेकरुन महापालिकेचेही उत्पन्न वाढेल आणि लोकांचीही सोय होईल.

तसेच मा.आयुक्त साहेबांची मी विशेष आभार मानते की, त्यांनी कोलशेत येथे डेटा एन्ट्रीची सुविधा सुरु करण्यात येणार आहे. अतिशय चांगली योजना होती घेतली आहे. कारण हयावेळी ज्या वेळी अर्थसंकल्पाची बॅग आमच्यासाठी आली त्यावेळी आम्हाला वाटले की, टॅब किंवा लॅपटॉप आले. जमाना एवढा फास्ट चालू आहे की, टॅब, लॅपटॉपवर मॅसेज वगैर जातात. म्हणून पुढच्या वेळी बजेटचे पुस्तक न येता आम्हाला टॅबवर फीट करुन आलेतर खरोखर बरे होईल. जेणेकरुन पेपरवर्क, टाईम्स हे सगळे वाचेल आणि महापालिकेच्या कर्मचा-यांना हे सगळे वाटण्यासाठीही फिरावे लागते. पेट्रोल डिझेल वगैरे वाचेल. आणि एका की बोर्ड मध्ये सगळयांना पोहचेल. तसेच आपल्याकडे जी ऑनलाईन सेवा सुरु केलेली आहे ती अतिशय चांगली आहे. लोकांसाठीही चांगली आहे आणि नेटवर्कींग एवढे फास्ट आहे की, सगळयांचा वेळ वाचेल, पेपर वाचतील. आम्ही महासभेला इकडे आलो तर टेबलवर प्रत्येक अर्ध्या तासाला एक पेपर येत असतो. अधिका-यांना आणि नगरसेवकांना एकमेकांशी डायरेक्ट नगरसेवकांची संपर्क साधता येईल. हया बजेटच्या पुस्तकात मा.आयुक्त साहेबांनी त्यांच्या निवेदनातील पान नं. २६ की, २७ वर नमूद केले आहे की, पुढच्या बजेटला सगळ टॅबवर येईल. त्याबाबत मी मा.आयुक्त साहेबांचे आभार मानते आणि लवकरांत लवकर याची अंमलबजावणी करण्यात यावी अशी विनंती करते.

मा.महापौर महादेय, महापालिकेच्या जवळ जवळ १८२ प्रॉपर्टीज् आहेत की, ज्या प्रॉपटीज् आपण कुणालाही दिलेल्या नाहीत. त्या प्रॉपटी जर आपण लीजवर किंवा बी.ओ.टी. च्या धर्तीवर तसेच आपले अनेक भूखंडा आहेत त्यात शैक्षणिक भूखंड आहेत. हॉस्पीटलचे भूखंड आहेत किंवा इतर जे काही भूखंड आहेत ते बी.ओ.टी स्कीम किंवा लीजवर दिले तर आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल आणि हे उत्पन्न वाढण्यासाठी हया प्रॉपटीचे टेंडरींग सिस्टीम झाली पाहिजे. मागच्या वेळी शाळा-कॉलेजची टेंडरींग सिस्टीम तुम्ही काढली होती. पण ती मध्येच रोखण्यात आली. ब-याचशा लोकांनी टेंडर टाकले होते. पैसे भरले होते त्यांना पैसेही परत मिळालेले नाहीत. त्या पैशांचे काय करणार आहेत, टेंडरींग प्रोसेस पुन्हा चालू करणार आहेत की नाही मला माहिती नाही. हया भूखंडाचा विचार झाल्यास ते आपल्या मालकीत राहतील आणि त्यातून आपल्याला उत्पन्नही चालू राहिल.

त्याचप्रमाणे मी मागच्या अर्थसंकल्पाच्या वेळी सुध्दा सांगितले होते की, कोरम मॉलच्या बाजूला शहिद हेमंत करकरे साहेबांच्या नांवाने जे टेनिसकोर्ट वगैरे उभारलेले आहे. मागच्या वेळी मा.आयुक्त साहेबांनी नमूद केले होते ते नगरसेवक आणि अधिकारी वर्गासाठी विनामुल्य ठेवण्यांत आले आहे. परंतू माझ्या माहितीप्रमाणे अतिशय कमी नगरसेवक किंवा अधिकारी वर्ग त्याचा लाभ घेत असतील. ती महापालिकेची वास्तू आहे तिच्यावर आपण लाखो रुपये खर्च करतो. ते सुध्दा बी.ओ.टी तत्वावर किंवा भाडयाने दिल्यास त्याची देखभाल सुध्दा होईल आणि महापालिकेला त्यातून उत्पन्न सुध्दा मिळेल.

मा.महापौर महोदय, दरवर्षी आपण स्टेडीयमसाठी बराच खर्च करतो. त्याचे सुध्दा खाजगीकरण केले किंवा बी.ओ.टी.च्या माध्यमातून चालविण्यात दिले तर आणि देखभाल त्यांच्यावर सोपवली तर आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल आणि आपला खर्च कमी होईल. तरी हया दोन-तीन गोष्टींचा आपण विचार करावा कारण आपल्या महापालिकेचे उत्पन्न ब-याच प्रमाणांत कमी झाले आहे ते वाढविण्याचा दृष्टीने विचार करावा असे वाटते. आपल्या ब-याच प्रॉपर्टी अशा आहेत की, त्यांची निगा-देखभाल करणे आपल्याला मुश्कील झाले आहे.

तसेच खारेगांव नाका येथे जकातीसाठी गाडया थांबतात त्यावेळी तिथे वाहतूक कोंडी होते. तरी त्यावर कुठेतरी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे कारण त्या ठिकाणी दोन-तीन रस्ते एकत्र आल्यामुळे गाडया जकात भरल्याशिवाय निघून जातात त्यामुळे नियंत्रण ठेवलेतर महापालिकेचे उत्पन्न जास्तीत जास्त वाढेल.

मा.महापौर महोदय, महापालिकेचे उत्पन्न वाढवे यासाठी मला अजून एक सांगावेसे वाटते की, मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविण्यासाठी जर आपण सर्व्हे केला तर बरेचसे डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट, इंजिनिअर यांचे ऑफिस पहिल्या किंवा दुस-या मजल्यावर असतात. त्यांना टॅक्स आकारणी मात्र घरगुती दराने केलेली आहे आणि त्यामुळे आपले उत्पन्न कमी होत आहे. त्यामुळे मला असे वाटते की, त्यांना तर बिगर घरगुती दराने टॅक्स लावला तर आपल्या महापालिकेचे उत्पन्न पाच ते दहा टक्यांनी वाढेल.

वृक्षप्राधिकरण विभागामार्फत वृक्ष लागवड करणेसाठी तरतुद करतो. पंरतू वृक्ष लागवड करणेसाठी आपण वृक्ष देतो पण माती देत नाही तरी माती सुध्दा देण्यात यावी. दरवर्षी आपण झाडे देतो पण माती देत नाही. त्यामुळे प्रत्येकाला आम्ही माती पुरवू शकत नाही. महापालिकेकडून माती पुरविण्याची सुविधा व्हावी ही विनंती.

मा.महापौर महोदय, खारेगांव हा मोठा परिसर आहे. परंतू हया एवढा मोठया परिसरासाठी एकच स्मशानभूमी आहे. डोंगर भागातून, पारसिकनगर, घोलाईनगर येथून लोकांना हया स्मशानभूमीत यावे लागते. तरी स्मशानभूमी वाढविण्यांत यावी अशी विनंती आहे. त्याचप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानाची सोय असलेली स्मशानभूमी बांधून मिळण्यासाठी हया बजेटमध्ये समावेश व्हावा.

मा.महापौर महोदय, ग्रीडब्ल्यूटी चा जो सर्व्हे झाला आहे त्यात मा.आयुक्त साहेबांनी आमच्या खारेगांवचे दोन मेन रस्ते घेतलेले नाहीत. त्यांचे असे म्हणणे आहे की, त्या जागा ताब्यात आलेल्या नाहीत. पण जो मेन अस्तित्वातील रस्ता आहे तो तरी घेण्यात यावा. तिथे कोणताही अडथळा नाही. कारण वस्तूस्थिती अशी आहे की, ऑलरेडी जो रस्ता तुम्ही सांगताय तिथे बिल्डींग झाल्या आहेत. त्या तुम्ही तोडणार नाहीत. त्यामुळे जो अस्तित्वात आहे त्याचा तरी या बजेटमध्ये समावेश करण्यात यावा. मुख्य दोन रस्ते घेतले तरी बरे होईल. जेणेकरुन खारेगाव नाका ते हायवेला जोडण्यासाठी ते अत्यंत गरजेचे आहे. गेले अनेक वर्ष तो रस्ता झालेला नाही. आम्ही पाठपुरावा करत होतो परंतू सिवरेजच्या कारणामुळे तो रस्ता आम्हाला दिलेला नाही. परंतू आता सिवरेजचा टप्पा ही पार झालेला आहे. त्यामुळे हे दोन रस्ते हया बजेटमध्ये समाविष्ट करण्यांत यावेत अशी विनंती करते.

परिवहन सेवा :-

आमच्याकडील परिवहन सेवेबाबत मी टेकाळे साहेबांना ब-याचवेळा फोन केला आहे. पत्र व्यवहार सुध्दा केला आहे. खारेगाव ते सिडको बस स्टॉप म्हणजे ठाणा कॉलेजपर्यंत मला सकाळी सात वाजता बस पाहिजे. तुम्हाला सिडकोला बस रिकामी करता येत नसेल तर तुम्ही स्टेशनला बस नेताना ती बस सिडकोकडून स्टेशन न्या. जेणेकरुन शाळा-कॉलेजला जाणा-या मुलांची सोय होईल आणि वर्कींगसाठी जो प्रवासी ट्रेनला जातो त्यांना सिडको बस स्टॉप जवळ पडेल. परंत संध्याकाळी तशीच सात वाजता सिडको ते खांरेगाव अशी बस सुविधा केल्यास अतिशस चांगले होईल. तसेच माझ्या माहितीप्रमाणे ब-याच दिवसापासून खारंगांवच्या आतल्या बाजूला बस सुरु केलेल्या नाहीत. आता सिवरेजचे काम पूर्ण झाले आहे. टेकाळे साहेब मी ब-याच वेळा तुम्हाला फोन केला आहे. पेपरमध्ये सुध्दा बातमी दिली आहे. तरी सुध्दा तुम्ही बस सुविधा का देत नाही त्याचे कारण काय ते सांगा. मा. महापौर महोदय, खारेगांव हिरादेवी मंदिरापर्यंत बस जात नाहीत. सकाळच्यावेळेस अतिशय गैरसोय होते. बस फक्त पारसिकनगरपर्यंतच गतात. मी आपणांस विनंती करते तुम्ही उदयापासून त्या बसेस सुरु कराव्यात. हया बसेस पूर्वी चालू होत्या ते आताही त्या चालू ठेवाव्यात कारण लोकांची खुप गैरसोय होते. तसेच माझ्या माहितीप्रमाणे

हायकोर्टात काही तरी पेडींग होते म्हणून सगळीकडे बस स्टॉप झालेले नाही. आणि ब-याच वर्षापासून माझी बस स्टॉपची मागणी आहे. तरी ते तिन्ही बसस्टॉप हया बजेटमध्ये समाविष्ट करण्यांत यावेत. मा.महापौर महोदय, जेवढे सांगितले आहे त्याचा जरी समावेश केला तरी आम्ही आपले आभारी राहू. समाजमंदिराची मागणी आहे तरी त्यासाठीची निधी मिळावा अशी विनंती आहे. आणि मला बजेटवर बोलण्यास संधी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र!

**(तद्नंतर मा.महापौर सो., सायंकाळी ठिक ०५.५० वा. सभा तहकूब झाल्याचे घोषित करतात.)**

**सभा तहकुब झाल्याची वेळ सायं. ०५.५० वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक -१६/०७/२०१४**

**(सौ.छाया प्र. मानकर)**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सही/-**
**(हरिश्चंद्र श्रीपत पाटील)**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**